रायगड, नवी मुंबई
• वर्ष १७ • अंक २४८
www.ramprahar.com

# राम प्रहर

बुधवार, २६ मार्च २०२५ • पाने ८ • किंमत ₹२

अंतरंग

माथेरानच्या रस्त्यांवर रानडुकरांचा वावर/२
कुणाल कामरावर गुन्हा दाखल करण्याची मागणी/६
दिव्यांग कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्र संघ अजिंक्य/८

## कर्जतच्या एन.डी. स्टुडिओचे राज्य शासनाकडे हस्तांतरण



**मुंबई :** दिवंगत कलादिग्दर्शक नितीन देसाई यांनी उभारलेला कर्जत फाटा येथील एन.डी.स्टुडिओ महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाने परिचालनासाठी ताब्यात घेतला असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'एनडी'स आर्ट वर्ल्ड या संस्थेस १३० कोटी रुपयांचा धनादेश देऊन हस्तांतरणाची प्रक्रिया मंगळवारी (दि. २५) अधिकृत करण्यात आली. या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांची उपस्थिती लाभली. या वेळी उद्योग आणि मराठी भाषामंत्री उदय सामंत, विधान परिषद सभापती राम शिंदे, सांस्कृतिक कार्य विभागाचे अप्पर मुख्य सचिव विकास खरगे आणि इतर मान्यवर उपस्थित होते. या वेळी क्लॅप बोर्ड वाजवून एन.डी. स्टुडिओचा प्रतिकात्मक शुभारंभ करण्यात आला.

# दिशा प्रकरणात उद्धव ठाकरेंकडून खुर्चीचा गैरवापर

## वकिलांचा गंभीर आरोप; पोलिसांत तक्रार दाखल

**मुंबई : प्रतिनिधी**

बॉलीवूडचा दिवंगत अभिनेता सुशांतसिंह राजपूतची मॅनेजर दिशा सालियन हिच्या मृत्यूप्रकरणी तिचे वडील सतीश सालियन आणि वकील निलेश ओझा यांनी मंगळवारी (दि. २५) मुंबईचे गुन्हे शाखेचे अतिरिक्त पोलीस आयुक्त लखमी गौतम यांची भेट घेतली. यानंतर माध्यमांशी संवाद साधताना ॲड. ओझा यांनी आदित्य ठाकरे यांचा ड्रग्जच्या व्यापारात सहभाग असल्याचा आरोप करीत माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हेदेखील दिशा सालियन प्रकरणात सामिल असल्याचा गंभीर आरोप केला.

दिशा सालियन मृत्यू प्रकरण पाच वर्षांनंतर पुन्हा चर्चेत आले आहे. दिशाची आत्महत्या नाही तर हत्या करण्यात आल्याचा आरोप तिच्या वडिलांनी केला आहे. दरम्यान, या प्रकरणी त्यांनी मंगळवारी पोलीस आयुक्तांची भेट घेऊन लेखी तक्रार केली. या प्रकरणातील आरोपींवर गुन्हा दाखल करून तातडीने कारवाई





करण्याची मागणी करण्यात आली आहे.

माध्यमांशी बोलताना सतीश सालियन यांचे वकील निलेश ओझा म्हणाले की, आम्ही जी तक्रार दिली तिच एफआयआर आहे. यामध्ये आदित्य ठाकरे, दिनो मोरया, सूरज पांचोली, त्यांचे सुरक्षा रक्षक तसेच परमबीर सिंह, सचिन वाझे, रिया चक्रावर्ती हे सर्व लोक आमच्या तक्रारीनुसार आरोपी आहेत. तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी हे प्रकरण दाबण्यासाठी खुर्चीचा गैरवापर केला, म्हणून तेदेखील आरोपी आहेत.

आम्हाला फक्त दोन गोष्टी सिद्ध करायच्या आहेत की दिशा सालियान प्रकरण जेव्हा घडले तेव्हा त्या ठिकाणी आदित्य ठाकरे हे तिथे होते की नव्हते? दिशाचा मृत्यू हा नैसर्गिक नाही. त्यामध्ये अनेक संशयास्पद कारणे असल्याचे दिसत आहेत तसेच आदित्य ठाकरे यांनी याबाबत दिलेले स्पष्टीकरण हे खोटे आहे. आमच्याकडे काही प्रत्यक्षदर्शीदेखील आहेत. आम्ही फक्त आता नावे सांगत नाहीत, असेही ॲड. ओझा यांनी म्हटले.

### 'आदित्य ठाकरे यांचा ड्रग्सच्या व्यापारात सहभाग'

दिशाचे वडील सतीश सालियान यांचे वकील निलेश ओझा यांनी माध्यमांशी बोलताना 'उबाठा'चे युवा नेते आमदार आदित्य ठाकरेंवर गंभीर आरोप केले. नार्कोटेक्स ब्युरोच्या तपासात हे आढळून आले आहे की, आदित्य ठाकरे ड्रग्स बिझनेसमध्ये सहभागी आहेत. त्या संदर्भातील सगळी माहिती आम्ही दिलेली आहे. आदित्य ठाकरे, डिनो मोरिया यांच्या फोन कॉल्ससह समीर खान नावाच्या व्यक्तीची डीएफीपी नावाची कंपनी होती, जी ड्रग्सचे सिंडिकेट चालवत होती, असा दावा ॲड. ओझा यांनी केला.

## भारतीय पुरातत्व विभागाच्या अखत्यारितील शिवरायांचे किल्ले देखभालीसाठी राज्याकडे द्या

### सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांची केंद्राला विनंती

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय पुरातत्व विभागाच्या अखत्यारित येणारे छत्रपती शिवाजी महाराजांचे किल्ले संवर्धन तसेच देखाभाल व दुरूस्तीसाठी महाराष्ट्राच्या पुरातत्व विभागाकडे देण्यात यावेत, अशी विनंती राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केंद्रीय मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांच्याकडे पत्राव्दारे केली आहे.

छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठा साम्राज्याच्या जाज्वल्य इतिहासाची साक्ष देणारे महाराष्ट्रात ५४ गड किल्ले हे केंद्र संरक्षित असून ६२ गड किल्ले राज्य संरक्षित किल्ले आहेत. या किल्ल्यांचे संरक्षण व जतन तसेच देखभाल व दुरूस्तीसाठी राज्य शासन प्रयत्न करीत असून जर हे सगळे किल्ले राज्य शासनाच्या अखत्यारित दिल्यास त्यांची डागडुजी व देखभाल अत्यंत



प्रभावीपणे करता येईल. म्हणून हे किल्ले राज्य शासनाकडे देण्यात यावेत, अशी विनंती मंत्री ॲड. शेलार यांनी केली आहे.

'युनेस्को'च्या जागतिक वारसा स्थळांच्या यादीत आपल्या १२ ऐतिहासिक किल्ल्यांचा समावेश करण्यासाठी महाराष्ट्र शासनातर्फे मंत्री आशिष शेलार यांच्या नेतृत्वात शिष्टमंडळात पॅरिस येथे जाऊन आले आहे. यामध्ये रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, खांदेरी किल्ला आणि जिंजी किल्ला यांचा समावेश आहे.

महाराष्ट्राचे पुरातत्व आणि वस्तुसंग्रहालय संचालनालय हे वारसा संवर्धनातील विशेष तज्ज्ञ व पॅनेल केलेले कंत्राटदार आणि वास्तुविशारदांच्या माध्यमातून संवर्धनाचे काम प्रभावीपणे करू शकते तसेच पर्यटनाला चालना देण्यासाठी राज्य शासन काम करीत असून काही खासगी संस्थांकडून सीएसआरमधून निधीही शासनास उपलब्ध होऊ शकतो. इतिहासाची साक्ष देणारे हे किल्ले जतन करणे आमचे कर्तव्य असून अभिमानाचे कार्य ठरू शकते. त्यामुळे हे किल्ले भारतीय पुरातत्व विभागाकडून महाराष्ट्र पुरातत्व विभागाकडे हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरू करण्याचे निर्देश आपण द्यावेत, अशी विनंती ना. शेलार यांनी केली आहे.

## विधानसभा उपाध्यक्षपदी आमदार अण्णा बनसोडेंची बिनविरोध निवड



**मुंबई : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे आमदार अण्णा बनसोडे यांची महाराष्ट्र विधानसभेच्या उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली आहे. पिंपरी-चिंचवड शहराला २५ वर्षांनंतर मंत्रीपद दर्जा असणाऱ्या पदावर संधी मिळाली आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे कट्टर समर्थक म्हणून अण्णा बनसोडे ओळखले जातात. ते सुरुवातीला २००९मध्ये पहिल्यांदा विधानसभा निवडणूक जिंकले. त्यानंतर २०१९मध्ये आणि गेल्या २०२४च्या निवडणुकीत ते विजयी झाले. त्यांना आता मंत्रिपदाचा दर्जा असणाऱ्या विधानसभा उपसभापतीपदी संधी मिळाली आहे.

## मंत्री गोरेंविरोधात कट; तीन नेते आरोपींच्या संपर्कात -मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्याचे ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांच्यावर एका महिलेने आरोप करीत त्यांच्याकडून खंडणी उकळण्याचा प्रयत्न केला होता. या प्रकरणी संबंधित महिलेला सापळा रचून अटक करण्यात आली. या प्रकरणाचा पोलिसांकडून सखोल तपास चालू असतानाच या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्री गोरेंविरोधात हा कट रचला गेल्याचे म्हटले आहे. यामध्ये त्यांनी विरोधी पक्षातील तीन नेते आरोपींच्या संपर्कात असल्याची खळबळजनक माहितीही दिली.

जयकुमार गोरे यांच्यावर झालेले आरोप आणि त्यानंतर संबंधित महिलेला करण्यात आलेली अटक याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत निवेदन सादर केले. गोरेंसंदर्भातली केस २०१६मध्ये नोंद झाली व २०१९ला संपली. ते तेव्हा सत्तापक्षातही नव्हते, पण त्यानंतर अचानक हे उकरून काढण्याचा प्रकार झाला, असे मुख्यमंत्री म्हणाले.



मी गोरे यांच्या हिमतीची दाद देतो. एखादी व्यक्ती अशा स्थितीत गोष्टी मिटवण्याचा प्रयत्न करते, पण त्यांनी लाचेची मागणी झाल्यानंतर तक्रार केली. प्रत्यक्ष रोख रक्कम घेताना आरोपीला पकडण्यात आले. त्यामुळे हा ब्लॅकमेलिंगचाच प्रकार होता, असे सांगून मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, या प्रकरणातील तिघा आरोपींना अटक झाली आहे. एक स्वतः ती महिला आहे. दुसरा हा युट्युब पत्रकार तुषार खरात आहे आणि तिसरा अनिल सुभेदार नावाचा व्यक्ती आहे. या सगळ्यांनी मिळून हा कट रचला होता. याचे सगळे पुरावे सापडले आहेत.

प्रभाकर देशमुख यात थेट १०० वेळा या तिन्ही आरोपींशी बोलले आहेत, पण त्याहीपेक्षा मला वाईट वाटते ते म्हणजे सुप्रिया सुळे आणि रोहित पवार यांचे कॉल्स तुषार खरात यांना झाले आहेत. जयकुमार गोरेंचे जे व्हिडीओ झालेत ते आरोपींनी या दोघांना पाठवले आहेत. आता याची चौकशी होईल, पण हे चाललंय काय? आपण राजकीय शत्रू नाही, तर राजकीय विरोधक आहोत. अशा प्रकारे कुणाला जीवनातूनच उठवण्याचा कट रचला जात असेल तर हे चुकीचे आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले.

## निवडक

### छतीसगडमध्ये चकमकीत कमांडरसह तीन नक्षली ठार

**दंतेवाडा :** छतीसगडमधील दंतेवाडा आणि विजापूर जिल्ह्यांच्या सीमेवर मंगळवारी (दि.२५) सकाळी झालेल्या चकमकीत २५ लाख रुपयांचे बक्षीस असलेल्या टॉप कमांडरसह तीन नक्षलवादी ठार झाले. घटनास्थळावरून शस्त्रसाठाही जप्त करण्यात आला आहे, अशी माहिती दंतेवाडा परिक्षेत्राचे पोलिस उपमहानिरीक्षक कमलोचन कश्यप यांनी दिली.

### छावा चित्रपटाचे गुरुवारी संसद भवनात स्पेशल स्क्रीनिंग

**नवी दिल्ली :** सध्या देशभर गाजत असलेला छत्रपती संभाजी महाराजांवर आधारित छावा चित्रपट पंतप्रधान नरेंद्र मोदी २७ मार्च रोजी संसद भवनात पाहणार आहेत. संसद भवन ग्रंथालयाच्या बालयोगी सभागृहात होणाऱ्या या विशेष स्क्रीनिंगला अनेक केंद्रीय मंत्री आणि खासदार उपस्थित राहणार आहेत. त्याचप्रमाणे अभिनेता विकी कौशलसह छावा चित्रपटाचे कलाकार आणि टीम संसदेत विशेष प्रदर्शादरम्यान उपस्थित असेल.



**पनवेल : आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत तळोजा येथील बागेश्री सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या रहिवाशांसोबत बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस माजी नगरसेवक हरेश केणी, पापा पटेल, भाजप महिला मोर्चा अध्यक्ष साधना पवार, अनुसूचित जाती मोर्चा अध्यक्ष संदीप माघाडे, उपाध्यक्ष प्रकाश ओव्हाळ यांच्यासह पोलीस प्रशासनाचे अधिकारी, सोसायटीचे लोक उपस्थित होते. या वेळी नागरिकांनी त्यांच्या दैनंदिन जीवनात येणाऱ्या समस्या मांडल्या. त्यावर योग्य कार्यवाही होण्यासाठी आवश्यक ते निर्देश देण्यात आले.**

## राष्ट्रीय ब्लूम ऑलिम्पियाडमध्ये द्रोणागिरी हायस्कूलचे यश

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून विद्यार्थ्यांचे अभिनंदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय ब्लूम ऑलिम्पियाड स्पर्धेत रयत शिक्षण संस्थेच्या उरण द्रोणागिरी येथील इंग्रजी माध्यम विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सुयश प्राप्त केले आहे. याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांचे कौतुक केले.

राष्ट्रीय ब्लूम ऑलिम्पियाड स्पर्धेत देशभरातून २५ राज्यांतील १२००पेक्षा आधिक शाळांचा सहभाग होता. स्पर्धेत द्रोणागिरी इंग्रजी माध्यम विद्यालयातील १४९ विद्यार्थ्यांनी इंग्रजी, गणित, विज्ञान आणि सामान्य ज्ञान (जीके) अशा विविध विषयांची परीक्षा दिली होती. या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून यात द्रोणगिरी शाळेची दहावीतील शौर्या प्रदीप पाटील या विद्यार्थिनीने शाळा



स्तरावर सुवर्ण आणि राष्ट्रीय स्तरावर रौप्यपदक पटकाविले आहे. सहावीतील दुर्वा दिनेश जोशी हिने शाळा स्तरावर सुवर्णपदक जिंकले. याव्यतिरिक्त शाळा स्तरावर चार विद्यार्थ्यांना रौप्य आणि सात विद्यार्थ्यांना कांस्यपदक मिळाले आहे.

या यशाबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विद्यार्थ्यांसह शिक्षकांचे अभिनंदन केले. या वेळी शकुंतला ठाकूर, विशाल ठाकूर, कमलाकर पाटील, प्रदीप पाटील, नूतन पाटील, प्रथमेश पाटील, योगिता ठाकूर, करंजा मच्छीमार सोसायटीचे चेअरमन प्रदीप नाखवा, व्हाईस चेअरमन राजेंद्र नाखवा, स्कूल कमिटी चेअरमन हर्षद कोळी, राजेश नाखवा, मुख्याध्यापिका सोनाली कोळी, उपमुख्याध्यापक डी. सी. पाटील, शिक्षिका रोशनी पाटील, निशिता भगत आदी उपस्थित होते.

# यशासाठी आधी प्रवास सुरू करणे महत्त्वाचे!

## भारतरत्न सचिन तेंडुलकरचे प्रतिपादन; नवी मुंबईत क्रिकेट प्रशिक्षणाचा शुभारंभ



**नवी मुंबई : बातमीदार**

खेळातला प्रवास हा दोन प्रकारे सुरू होतो. मेंदूपासून सुरू होणारा प्रवास हा भौतिक गोष्टींकडे ओढत असतो, परंतु हृदयातून सुरू होणारा प्रवास हा खरा प्रवास असतो. या प्रवासात कितीही अडथळे आले तरी त्यातून आपण मार्ग काढतो. हा प्रवास उत्साह वाढवतो व अंतिमतः यश देतो. यश ही प्रवासातली पुढची गोष्ट आहे. त्याआधी प्रवास सुरू करणे महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन भारतरत्न सचिन तेंडुलकर याने मंगळवारी (दि. २५) नवी मुंबईत केले.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमधील गुणवंत विद्यार्थ्यांना शास्त्रशुद्ध क्रिकेट प्रशिक्षण मिळावे या दृष्टीने नेरूळ येथील डॉ. डी.वाय. पाटील स्टेडियम येथे असलेल्या सचिन तेंडुलकर क्रिकेट अकॅडमीमध्ये यंदाच्या प्रशिक्षणाचा शुभारंभ करण्यात आला. त्या वेळी मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर मार्गदर्शन करीत होता.

महापालिकेचे आयुक्त डॉ. कैलास शिंदे, डॉ. डी.वाय पाटील स्टेडियमचे अध्यक्ष विजय पाटील, मनपा क्रीडा विभागाच्या उपायुक्त अभिलाषा म्हात्रे-पाटील, क्रीडा अधिकारी रेवप्पा गुरव, शिक्षणाधिकारी अरुणा यादव तसेच शिक्षक, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

या वेळी लहानपणीच्या क्रिकेटच्या आठवणी सांगताना सचिन म्हणाला की, माझ्या भावाने क्रिकेट खेळण्याचे माझ्यातील कौशल्य हेरून मला आचरेकर सरांकडे प्रशिक्षणासाठी पाठवले. आपल्यातील कौशल्ये ओळखणारा व त्यासाठी योग्य संधी उपलब्ध करून देणारा आपुलकीचा व्यक्ती जीवनात गरजेचा असतो. ही संधी महापालिकेच्या मुलांसाठी उपलब्ध करून देण्यासाठी जो पाठिंबा आपण देत आहात तो महत्त्वाचा असल्याचे सांगत सचिनने यश मिळाल्यानंतर ज्या प्रमाणे मुलांच्या पाठीशी उभे राहता त्या प्रमाणेच अपयशाच्या काळातही खंबीरपणे सोबत रहा, असे आवाहन केले.

## रयत माऊली लक्ष्मीबाई पाटील यांचा शनिवारी पुण्यतिथी कार्यक्रम



**सातारा : प्रतिनिधी**

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पत्नी रयत माऊली लक्ष्मीबाई पाटील यांच्या ९५व्या पुण्यतिथीचा कार्यक्रम संस्थेच्या स्थानिक शाखांच्या वतीने शनिवारी (दि. २९) दुपारी ३.३० वाजता धनिणीच्या बागेतील श्री छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊस नंबर १ येथे आयोजित करण्यात आला आहे.

रयत माऊली लक्ष्मीबाई पाटील यांचे ३० मार्च १९३० रोजी गुढीपाडव्याच्या आदल्या दिवशी निधन झाले होते. त्यांच्या स्मृती जपण्यासाठी दरवर्षी गुढीपाडव्याच्या आदल्या दिवशीच पुण्यतिथी कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. हा कार्यक्रम रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकात दळवी यांच्या अध्यक्षेखाली होणार असून संस्थेचे संघटक डॉ. अनिल पाटील, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत, असे संस्थेचे सचिव विकास देशमुख यांनी सांगितले.

## अनेकांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या रियाझ बंदरकरला अटक

### दोन दिवसांची पोलीस कोठडी



**अलिबाग, मुरूड : प्रतिनिधी**

आमच्या कंपनीत गुंतवणूक करा तुम्हाला चांगला परतावा देतो असे आमिष दाखवून लोकांची आर्थिक फसवणूक करून आखाती देशात पसार झालेल्या रियाझ बंदरकर याला रायगड पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने कोची विमानतळावरून ताब्यात घेतले आहे. अलिबाग सत्र न्यायालयाने त्याला २ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली.

रियाज अहमद कासीम बंदरकर याने २०१९मध्ये मुरूड येथे तिजाराहा इंटरप्रायझेस नावाने कंपनी सुरू केली होते. या कंपनीमध्ये नागरिकांना पैसे गुंतवल्यास चांगला परतावा देतो असे आमिष दाखवले. त्यानुसार लोकांनी पैसे गुंतवले. काही दिवस गुंतवणूकदारांना परतावा दिला, मात्र काही दिवसांनी तो दुबईत पळून गेला. त्याने गुंतवणूकदारांची एक कोटी ७८ लाख रुपयांची फसवणूक केली. याबाबत मुरूड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हा दाखल झाल्यापासून आरोपी रियाझफरार झाला होता. त्याचा शोध लागत नसल्याने पोलिसांनी त्याच्या विरोधात लूक आऊट नोटीस जारी केली होती. केरळमधील कोची विमानतळावर तो दाखल झाल्याचे समजताच रायगड पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने त्याला ताब्यात घेतले.

रियाझला अटक करून पोलिसांनी अलिबाग येथील विशेष सत्र न्यायाधीश सृष्टी निळकंठ यांच्यासमोर हजर केले. दोन्ही बाजूचे युक्तीवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने रियाझ बंदरकराला २ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले.

औद्योगिकीकरण, स्थलांतरामुळे

# रायगडातील पशुधनात घट

## पशुगणनेचे काम ८० टक्के पूर्ण; निश्चित आकडेवारी लवकरच होणार स्पष्ट

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील १ हजार ६८० गावे आणि २३४ नगरपालिका हद्दीतील प्रभा्गांमध्ये २१ व्या पशुगणनेचे काम अंतिम टप्प्यात आहे. यासाठी सुपरवायझर आणि प्रगणक असे १९८ कर्मचारी काम करीत आहेत. रायगड जिल्ह्यात आतापर्यंत ८० टक्के काम झाले असून ३१ मार्चपूर्वी पशुगणना पूर्ण होईल, असा अंदाज आहे. वाढते औद्योगिकीकरण आणि शहराकडे होणारे स्थलांतर यामुळे पशुधनात १० ते १५ टक्के घट दिसण्याची शक्यता आहे.



कोकणात दिवसेंदिवस वाढणार नागरीकरण आणि औद्योगिकीकरण यामुळे शेती, गुरचरण क्षेत्र कमी होत आहे. शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढत आहे. त्याचबरोबर पशुपालकांचा कल आता कमीत कमी पशुधनातून जास्तीत जास्त उत्पादन घेण्याकडे वाढत आहे. या सर्वाचा परिणाम कोकणातील पशुधनावर होत आहे. सध्या २१वी पशुधन गणना सुरू आहे. त्यानंतर कोकणातील पशुधनाची निश्चित आकडेवारी स्पष्ट होणार आहे.

कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, ठाणे आणि पालघर या जिल्ह्यांमध्ये कधीकाळी विपुल प्रमाणात पशुधन होते. पण आता परिस्थिती बदलत आहे. कोकणातील गावातल्या प्रत्येक गोठ्यात किमान आठ दहा गुरांची असलेली संख्या गेल्या काही वर्षांत कमालीची रोडावली आहे. काही वर्षांपूर्वी काही हजारांच्या संख्येत असलेले पशुधन आता काही शेकड्यांवर आले आहे. बाजारात उपलब्ध असलेल्या आयत्या व सहज उपलब्ध होणार्या वस्तुंचे प्रमाण वाढल्याने खेड्यातील माणसांची शेतात कष्ट करण्याची इच्छा कमी कमी होत गेली. गावातली तरुणाई शेतीपासून दूर गेली आणि मुंबई, पुण्यासारख्या शहरात जाऊन विसावली. कधीकाळी पशुधनाने संपन्न असलेले व गजबजलेला कोकण प्रांतात आता नागरीकरण झपाट्याने सुरु आहे. याचा सर्व परिणाम शेती आणि शेतीवर अवलंबून असलेल्या व्यवसायांवर होत आहे. शेतीला संपन्न करून उत्पादनात महत्वाची भूमिका बजावणारे पशुधन गेली काही वर्षांत घटत चालले आहे.

शेतीवर अवलंबून असणाऱ्या कुटुंबाला पशुसंवर्धन हा आर्थिक उत्पन्न देणारा महत्त्वाचा व्यवसाय आहे. त्यामुळे शासनामार्फत दर पाच वर्षांनी पशुगणना केली जाते. यात देशी विदेशी संकरित गाय, म्हैशी, रेडे, मेंढरे, शेळ्या, डुकरे, गाढवे व इतर काही प्राण्यांची माहिती संकलीत करण्याचे काम करण्यात येते. याशिवाय कोंबड्या, बदके आदी पक्ष्यांचीही गणना करण्यात येते. यामुळे शासनाला उपलब्ध पशुधनाची निश्चित माहिती होऊन त्याप्रमाणे योजना तयार करता येतात.

सध्या २१वी पशुगणना सुरु आहे. राज्यात २६ नोव्हेंबर २०२४ पासून ही पशुगणनेची प्रक्रिया सुरु झाली आहे. या पशुगणनेची मुदत २८ फेब्रुवारीपर्यंत होती. मात्र शासनाने ही मुदत ३१ मार्चपर्यंत वाढवली आहे. या पशुधन गणनेची निश्चित आकडेवारी ३१ मार्चनंतर समोर येणार असली तरी मागील पाच वर्षात पशुधनापेक्षा दहा ते १५ टक्क्याने पशुधन कमी झाले असल्याची शक्यता अधिकाऱ्यांकडून व्यक्त होत आहे.

**आतापर्यंत ८० टक्के काम पूर्ण झाले आहे. शासनाने ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ दिली आहे. तरी लवकरात लवकर या पशुगणनेचे काम पूर्ण होईल. जिल्हयात नागरीकरण वाढत आहे. शेती कमी होत आहे. पशुपालकांचा कमीत कमी जनावरांमध्ये अधिक उत्पादन घेण्याकडे कल आहे. त्यामुळे पशुधनात सुमारे १० ते १५ टक्के घट दिसण्याची शक्यता आहे.**
**-डॉ. सचिन देशपांडे, जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, रायगड**

# महाडमध्ये बाजारपेठेत साडी दुकानाला आग, लाखोंचे नुकसान

**महाड : प्रतिनिधी**



महाड शहरातील भर वस्तीत असलेल्या चामुंडा या साडी दुकानाला रविवारी मध्य रात्री दीड वाजण्याच्या सुमारास अचानक आग लागून दुकानातील लाखो रुपयांचे कपडे जळून खाक झाले. महाड शहर पोलीस आणि महाड नगरपालिका अग्निशमन दल घटनास्थळी तातडीने दाखल झाल्याने पुढील अनर्थ टळला.

रोशनलाला भारूजी गुर्जर यांचे महाड बाजार पेठेत चामुंडा नावाने साडी सेंटर आहे. या ठिकाणी हे गेली १३ वर्ष साडी आणि ड्रेस मटेरियल विक्री व्यवसाय करत आहेत. रविवारी रात्री ९ वाजता दुकान बंद करून मालक आणि कामगार आपल्या घरी गेले असता. मध्य रात्री दीड वाजण्याच्या सुमारास दुकानातून धूर बाहेर येऊ लागला आजू बाजूच्या दुकानदारांच्या आग लागल्याची बाब लक्षात येताच त्यांनी महाड शहर पोलीस आणि महाड नगरपालिका अग्निशमन दलाला या घटनेची माहिती दिली. मात्र दुकानात कपडे असल्या मुळे काही वेळेतच आगीने रुद्ररूप धारण केले होते. तात्काळ पोलीस प्रशासन आणि अग्निशमन दल घटनास्थळी पोहचले. अग्निशमन दलाच्या जवानांना अथक प्रयत्ना नंतर आगीवर नियंत्रण आण्यास यश आले.

सध्या रमझान आणि लगीनसरायी सुरू असल्याने मोठ्या प्रमाणात या दुकानात खरेदी साठी ग्राहकांची गर्दी असते. या कारणाने दुकाना मध्ये जवळ पास एक कोटीचा माल भरण्यात आला असल्याची माहिती मालक रोशनलाला यांनी दिली. लागलेल्या आगी मध्ये निम्या पेक्षा जास्त माल जाळून खाक झाला असून उर्वरित माल देखील आगीच्या धुराने काळा पडला असल्याचे त्यांनी सांगितले. ही आग कशा मुळे लागली की लावण्यात अली अद्याप याचे कारण समजू शकले नाही.

# माथेरानच्या रस्त्यांवर रानडुकरांचा वावर

## पाण्याच्या शोधात जंगली पशू लोकवस्तीत

**माथेरान : प्रतिनिधी**

उन्हाचा वाढता दाह आणि येथील वन क्षेत्रातील लागणाऱ्या आगीच्या घटनांमुळे माथेरान शहरातील नागरिक वस्तीत जंगली पशु,पक्षी,प्राणी यांचा वावर वाढल्याचे दिसून येत आहे.जंगल भागातील नैसर्गिक जलस्रोत आटल्यामुळे तसेच खाद्याच्या शोधात प्राणी लोकवस्तीत येत आहेत.

काळानुरूप जमिनीची धूप झाल्यामुळे येथे नैसर्गिक जलस्रोत बुजले आहेत. बेलवेडीयर विहीर, मॅलेट स्प्रिंग हे जलस्रोत इतिहास जमा होण्याच्या मार्गावर आहेत, तर हॅरीसन स्प्रिंग येथील टाकी येथील स्थानिकांनी मागील काळात साफ केल्यामुळे याठिकाणी पाण्याचा साठा आहे.



दोन-तीन दिवसांपूर्वी रात्रीच्या वेळी ई-रिक्षातून येत असताना काही लोकांना सखाराम-तुकाराम पॉइंटजवळ एक रानडुक्कर रिक्षाच्या उजेडात समोर दिसले. मागील वेळेस देखील येथील एका खासगी बंगल्याच्या आवारात एका भेकराच्या पिल्लावर येथे भटक्या कुत्र्यांनी हल्ला केला होता.माथेरानच्या जंगल भागात असणारे जंगली प्राणी सध्या अनेकांना स्पष्ट नजरेने दिसत आहेत.

येथील फाउंटन लॉज बंगल्याचे माळी या दोन तीन महिन्यात त्यांच्या बंगल्याच्या पूर्ण परिसरात प्राण्यांसाठी पाण्याची सोय करीत असतात.जंगली भेकर,माकडे आणि पशुपक्षी याठिकाणी पाणी पिण्यासाठी येतात असे त्यांनी सांगितले. त्यामुळे असे मोठे कृत्रिम पाणवठे वन क्षेत्रात केले तर पशु-पक्ष्यांची तहान भागू शकेल असे येथील माथेरान निसर्गमित्र संस्थेचे अध्यक्ष पवन गडवीर यांच्या कडून तसेच येथे येणाऱ्या पशुप्रेमींकडून सांगितले जात आहे.

**पाण्याच्या शोधत रानडुक्कर नागरी वस्तीत आले असावे. पशूपक्ष्यांसाठी पाणवठे तयार करण्याचा प्रयत्न आहे.निधी उपलब्ध झाला तर लवकरच कृत्रिम पाणवठे तयार करता येतील.**
**-राजकुमार आडे, वनपाल, माथेरान**

# लोक अदालतीत पाच हजार ९२७ ग्राहकांच्या प्रकरणांचा निपटारा

**कल्याण : प्रतिनिधी**

तालुकास्तरावर २२ मार्चला आयोजित राष्ट्रीय लोक अदालतीतून कल्याण व भांडुप परिमंडलातील कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडित तसेच वीजचोरीची दाखलपूर्व व प्रलंबित अशी ५ हजार ९२७ प्रकरणे तडजोडीद्वारे निकाली काढण्यात आली. महावितरणच्या उपलब्ध सवलतीचा लाभ घेत संबंधित ग्राहकांनी ७ कोटी ८६ लाख रुपयांचा भरणा केला.




कल्याण व भांडुप परिमंडलातील कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडित केलेल्या तसेच वीज चोरीची दाखलपूर्व व प्रलंबित प्रकरणे सामंजस्याने सोडवण्यासाठी लोक अदालतीत ठेवण्यात आली होती. कल्याण परिमंडलांतर्गत ५ हजार ६१८ प्रकरणांमध्ये तडजोड होऊ शकली व ७ कोटी ५२ लाख रुपयांचा भरणा झाला. तर भांडुप परिमंडलांतर्गत ३३ लाख ३२ हजार रुपयांचा भरणा करणाऱ्या ३०९ ग्राहकांच्या प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यात आला.

ठाणे, रायगड आणि पालघर जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सहकार्याने तसेच भांडुप परिमंडलाचे मुख्य अभियंता सुनिल काकडे व कल्याण परिमंडलाचे मुख्य अभियंता चंद्रमणि मिश्रा यांच्या मार्गदर्शनाखाली लोक अदालत यशस्वी केली.

# कर्जत उपजिल्हा रुग्णालयात आधुनिक पद्धतीचे शौचालय बसवण्याची भाजपकडून मागणी

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत उपजिल्हा रुग्णालयात येणाऱ्या रुग्णासाठी आधुनिक पद्धतीचे शौचालय बसवण्यात यावे म्हणून भारतीय जनता पार्टी कडून मागणी करण्यात आली आहे. यासाठी कर्जत भाजप युवा मोर्चा चिटणीस अभिषेक तिवारी यांनी पुढाकार घेतला असून तसे लेखी निवेदन कर्जत उपजिल्हा रुग्णालय वैद्यकिय अधिकाऱ्यांना देण्यात आले आहे.



कर्जत तालुका आदिवासी बहुल तालुका म्हणून ओळखला जातो. येथील आदिवासी नागरिकांना कर्जत उपजिल्हा रुग्णालयात हे महत्वाचे रुग्णालय म्हणून याकडे पाहिले जाते. मागील काही वर्षात कर्जत उपजिल्हा रुग्णालय हे सर्वांसाठी एक उत्तम आणि अत्याधुनिक सोयी युक्त रुग्णालय म्हणून येथील शहरातील रुग्ण ही पर्यायी रुग्णालय म्हणून उपयोगी पडत आहे. येथे येणाऱ्या रुग्णाला वेळेत उपचार मिळत आहेत, त्यामुळे उपचार घेण्यासाठी तालुक्यातील ग्रामीणभाग तसेच शहरातील रुग्णाची येथे संख्या वाढत चालली आहे.


या रुग्णालयात बसवण्यात आलेल्या जुन्या भारतीय पद्धतीची शौचालये या विशेष गटातील लोकांसाठी गैरसोयीची होत आहेत. गर्भवती महिलांना खाली बसणे आणि उठणे त्रासदायक ठरत आहे. लहान मुलांना आणि ज्येष्ठ नागरिकांनाही भारतीय शौचालये वापरण्यास खूप अडचणी होत आहेत. शौचालयाचा येथील गरोदर माता रुग्णाचा त्रास होत असल्याची तक्रार येथील भाजप कार्यकर्त्यांना मिळाली होती.

त्यानुसार कर्जत तालुका भाजप युवा मोर्चाचे चिटणीस अभिषेक तिवारी यांनी लागलीच माहिती घेत रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांना निवेदन देत अत्याधुनिक वेस्टर्न कमोड शौचालयांची व्यवस्था करणे निवेदन देण्यात आले आहे. रुग्णालयात ही व्यवस्था झाल्यास रुग्णाला अधिक आरामदायी आणि सोयीस्कर म्हणून पाहिले जात आहे.यावेळी ॲड .अभिषेक तिवारी, ॲड . प्रीति तिवारी, माजी नगरसेवक बळवंत घुमरे, बिनीता घुमरे, सरस्वती चौधरी, सुषमा ढाकणे, मारुती देवघरे यांसह भाजप पदाधिकारी उपस्थित होते.

# जागतिक जल दिनानिमित्त सिडकोतर्फे प्रभात फेरीचे आयोजन

**नवी मुंबई : बातमीदार**

गोड्या पाण्याचे व त्या पाण्याच्या संसाधनांचे शाश्वत व्यवस्थापन यांचे महत्त्व पटवून देण्यासाठी दरवर्षी २२ मार्च हा जागितक जल दिन म्हणून साजरा केला जातो. या निमीत्त सोमवार, ( दि. २४ ) रोजी सिडको महामंडळाच्या पाणी पुरवठा विभागातर्फे सिडको पाणी पुरवठा कार्यालय, सेक्टर-१एस, नवीन पनवेल ते बांठिया माध्यमिक विद्यालय, सेक्टर-१८, नवीन पनवेल दरम्यान सकाळी ८.०० वाजता प्रभात फेरी काढण्यात येऊन नागरिकांना पाण्याचे महत्त्व पटवून देण्यासह पाणी बचतीचा संदेश देण्यात आला.



या प्रसंगी शेवतकर, अधीक्षक अभियंता, पाणी पुरवठा, सिडको, बी. व्ही. गायकवाड, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा, सिडको, व्ही. बी. पाटील, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा, सिडको, चव्हाण, उपअभियंता, पनवेल महानगरपालिका, वायदंडे, उपअभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पनवेल, प्रशांत वा. चहारे, सहा. कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा, सिडको, विद्या , सहा. कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा, सिडको आणि प्रफुल देवरे , सहा. कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा, सिडको या अधिकाऱ्यांनी उपस्थित नागरिक आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

सिडकोच्या नवीन पनवेल येथील पाणी पुरवठा कार्यालय येथुन प्रभात फेरीचा प्रारंभ होऊन बांठिया विद्यालय येथे समारोप करण्यात आला. प्रभात फेरीमध्ये बांठिया विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी व लेझीम पथकाने सहभाग घेतला. घोषणा देऊन तसेच फलक दर्शवून पाणी बचतीचा संदेश यावेळी देण्यात आला. सिडकोच्या पाणी पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी नागरिक आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून पाण्याचे महत्त्व पटवून दिले.

# पत्रकाराकडे आत्मविश्वास, धैर्य हवे -श्रीराम पुरोहित

**कर्जत : प्रतिनिधी**

पूर्वीची पत्रकारिता खूप कठीण होती. साधने नव्हती. त्या परिस्थितीही सामाजिक भान राखून कर्जतमध्ये अनेकांनी पत्रकारिता केली. पत्रकाराकडे धीर, धैर्य, आत्मविश्वास आदी गोष्टींची आवश्यकता आहे. आम्ही त्यावेळी पत्रकारिता करताना कधी चहा पाणी किंवा कशालाच थांबत नव्हतो. त्याची दखल अनेक वेळा मंत्र्यांनीही घेतली होती. आता सोपे झाले आहे. अनेक साधने हातात आली आहेत. यु ट्यूब वाल्यांचे तर अधिक सोपे झाले आहे. मात्र विश्वासार्हता असणे फार महत्वाचे आहे. स्वतःची किंमत करून घेऊ नका असा सल्ला जेष्ठ पत्रकार श्रीराम पुरोहित यांनी येथे केले.

कर्जतच्या प्रादेशिक संशोधन केंद्राच्या सभागृहात कृषीविश्वच्या वर्धापन दिना निमित्त तालुकास्तरीय पत्रकारांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. श्रीराम पुरोहित यांच्या हस्ते समारंभाचे उदघाट्न करण्यात आले. याप्रसंगी रायगड प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत गोपाळे, कार्याध्यक्ष संजय मोहिते, सचिव दर्वेश पालकर, विभागीय सचिव ॲड. राहुल देशमुख, सल्लागार भाई ओव्हाळ, विजय मांडे, कर्जत प्रेस क्लबचे कार्याध्यक्ष विलास श्रीखंडे, प्रगतशील शेतकरी चंद्रकांत मांडे उपस्थित होते. श्रीखंडे यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रास्ताविक केले. राहुल देशमुख आणि विजय मांडे यांनी विचार मांडले. कार्याध्यक्ष श्रीखंडे यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यात आल्या.

# पनवेल महानगरपालिकेतर्फे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त निबंध व वक्तृत्व स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

'भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती' निमित्ताने सर्व माध्यमाच्या व सर्व व्यवस्थापनाच्या शाळा, उच्च माध्यमिक विद्यालय, महाविद्यालयामध्ये शालेय स्तरावर दिनांक २६ मार्च ते ०१ एप्रिल या कालावधीत निबंध, वक्तृत्व स्पर्धाचे दिलेल्या गटात व विषयानुसार आयोजन करावे व या स्पर्धेतील प्रथम ३ क्रमांक (प्रत्येक गटातील) यांची नावे दिनांक ०२ एप्रिल रोजी सकाळी १२ वाजेपर्यंत मनपा शिक्षण विभाग (लोकनेते दि.बा. पाटील विद्यालय शाळा क्र.१, दांडेकर हॉस्पिटल समोर, पनवेल) कार्यालयात सादर करावीत असे महापालिकेच्यवतीने सूचित करण्यात आले आहे.

माननीय आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या या स्पर्धा शालेय दोन गट व खुला गट अशा तीन गटात घेतल्या जाणार आहेत. तिन्ही गटांसाठी निबंध व वक्तृत्व स्पर्धांसाठी विविध विषय देण्यात आले आहे. शाळा स्तरावर प्रथम येणाऱ्या तीन क्रमाकांना प्रमाणपत्र व सन्मानचिन्हाने गौरविण्यात येणार आहे. तसेच मनपा स्तरावर प्रथम येणाऱ्या तीन क्रमाकांना रोख रक्कम,सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

पनवेल महानगरपालिकेच्यावतीने सोमवार दिनांक ०७ एप्रिल २०२५ रोजी निबंध व वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन आयुक्त तथा प्रशासक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे.या स्पर्धा लोकनेते दि.बा.पाटील विद्यालय शाळा क्र.१, दांडेकर हॉस्पिटल समोर, पनवेल येथे सकाळी ०९:०० वाजता घेतल्या जाणार आहेत.या स्पर्धा तीन गटात घेतले जाणार आहे, तीनही गटांसाठी मराठी, इंग्रजी माध्यमातून स्पर्धा घेण्यात येतील. तिन्ही गटांसाठी विषय पुढे दिल्याप्रमाणेच राहतील.

निबंध व वकृत्व स्पर्धेसाठी शाळा स्तरावर प्रथम,द्वितीय व तृतीय क्रमांक आलेल्या स्पर्धकांनी आपल्या प्रवेशिका लोकनेते दि.बा. पाटील विद्यालय मनपा शाळा क्र.१मधील मुख्याध्यापक केंद्रप्रमुख श्री.वाल्मीक राठोड यांच्याकडे ०२ एप्रिल रोजी सकाळी १२ वाजेपर्यंत प्रथम तीन क्रमांकाची नावे द्यावीत या स्पर्धेचा निकाल दिनांक१४ एप्रिल २०२५ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन पनवेल येथे मिरवणूक पूर्ण झाल्यानंतर घोषित करण्यात येईल.

**चौकट – निबंध स्पर्धा**

अ) ५ ते ७ शालेय गट- निबंध स्पर्धा शब्द मर्यादा २००

**विषय-** १) संविधानाचे भाग्यविधाते डॉ. बाबासाहेब आंबेडकर
२) माझी माय रमाई
३ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बालपण

ब) ८ ते १२ शालेय गट- निबंध स्पर्धा शब्द मर्यादा ४०० शब्द

**विषय-** १) स्त्री मुक्तीसाठी डॉ. बाबासाहेबांचे आंबेडकर योगदान
२) मला भावलेले डॉ.बाबासाहेब आंबेडकर
३) शिक्षण तज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर

क) खुला गट- निबंध स्पर्धा शब्द मर्यादा ५०० शब्द

**विषय** -१) नवीन उद्योजकांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक प्रेरणा स्थान'
२) बुद्ध आणि त्यांचा धम्म-सर्व समस्यांचे निराकरण'
३) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संविधानातील योगदान

**स्पर्धेसाठी नियम व अटी लागू**
१) स्पर्धेसाठी दि. ०७/०४/२०२५ रोजी वेळ सकाळी ९:०० राहील.
२) निबंध यापूर्वी कुठेही प्रसिद्ध झालेला नसावा.
३) एका व्यक्तीस वरील गटानुसार एकाच विषयावर एकच निबंध लिहिण्याची अनुमती असेल.
४) सदर निबंधात वैध संदर्भ असणे अनिवार्य राहील.
५) एका व्यक्तीस वरील गटानुसार एकाच विषयावर वक्तृत्व स्पर्धेत भाग घेण्याची अनुमती असेल.
६) निबंध अथवा वक्तृत्व स्पर्धेचा निकाल दिनांक १४ एप्रिल २०२५ रोजी जाहीर केला जाईल.
७) निबंध अथवा वक्तृत्व स्पर्धेच्या निकालाबाबतचे पूर्ण अधिकार आयोजकांकडे राखीव राहतील.

**वक्तृत्व स्पर्धा –**

अ) ५ ते ७ (शालेय गट)- वक्तृत्व स्पर्धा वेळ ३ मिनिटे

**विषय** – १) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक कार्य
२) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक कार्य
३) संविधानातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान

ब) ८ ते १२ शालेय गट – वक्तृत्व स्पर्धा वेळ ५ मिनिटे

**विषय-**
१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे अस्पृश्यता निर्मूलन कार्य
२)संविधान निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर
३) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा शिक्षण प्रवास

क) खुला गट – वकृत्व स्पर्धा वेळ ७ मिनिटे

**विषय** -१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता
२) राष्ट्र निर्मितीसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान
३) डॉ.बाबासाहेब आंबेडकर एक सामाजिक चळवळ

**स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी**
यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन महापालिकेने केले आहे.
१. श्री.अशफाक काझी (केंद्र समन्वयक) ७०४५८८०६७९
२.श्री.वाल्मिक राठोड (केंद्र प्रमुख) ८०९७५६८९२८
३.श्री.वैभव सि.पाटील(केंद्र प्रमुख) ८९८३५६०७१०

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पाठपुराव्यामुळे चिपळे गावातील रस्त्याचे काँक्रीटीकरण

## एमएमआरडीएच्या माध्यमातून २१ लाख रुपयांचा निधी मंजूर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पाठपुराव्यामुळे व भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या सहकार्याने चिपळे गावातील अंतर्गत रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्यासाठी एमएमआरडीएच्या माध्यामतून २१ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

या रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन भाजपचे तालुका सरचिटणीस भूपेंद्र पाटील, नेरे जिल्हा परिषद अध्यक्ष सुनील पाटील, युवा मोर्चा तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील यांच्या हस्ते सोमवारी (दि. २३) झाले. या वेळी विष्णू पाटील, तुकाराम बामा पाटील, मनोहर पाटील, विठ्ठल पाटील, हभप तुकाराम पाटील, शशिकांत फडके, सुभाष पाटील, दिनकर पाटील, महेंद्र पाटील, नेहा नारखेडे, चंद्रकांत ऐकाले, प्रवीण अलवलिया, श्रीनिवास राव, चंद्रशेखर शर्मा, सुरेश माल्या, रवींद्र पाटील, भाजप चिपळे अध्यक्ष समीर पाटील, रवी रोहित पाटील, विशाल पाटील विजय पाटील, समीर पद्माकर पाटील, प्रतीक फडके, सौरभ पाटील, किरण पाटील, विघ्नेश पाटील, अजित म्हात्रे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते. सर्वांनी आमदार प्रशांत ठाकूर यांचे आभार मानले

# महामार्गावरील अवैध होर्डिंग्जना नोटीस

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महानगरपालिका हद्दीत असलेल्या मुंब्रा-पनवेल महामार्गावरील जाहिरातींच्या फलकांना अखेर एमएसआरडीसीकडून अनधिकृत असल्याच्या नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. त्यामुळे आता हे जाहिरातींचे फलक धोकादायक व अनधिकृत असल्याचे स्पष्ट झाले आहे. मात्र, याच जाहिरात फलकांना पनवेल महानगरपालिकेने परवानग्या दिल्या आहेत का? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

मुंब्रा-पनवेल महामार्गावर असलेल्या मोठमोठ्या जाहिरात फलकांवर एमएसआरडीसीकडून हे जाहिरातींचे फलक धोकादायक तसेच एमएसआरडीसीच्या मालकी हक्काच्या जागेवर उभारण्यात आल्याचे सांगत ही जाहिराती फलक तत्काळ काढावेत, अन्यथा कारवाई करण्यात येईल, अशा प्रकारची नोटीस लावण्यात आली आहे. तसेच संबंधितांनी योग्य प्रतिसाद न दिल्यास एमएसआरडीसी त्यांच्यावर कारवाई करणार असली तरी, पनवेल महानगरपालिकेने या जाहिराती फलकांना परवानगी दिली आहे का? हा सवाल उपस्थित होत आहे. जर महापालिकेने त्यांना परवानगी दिली असेल, तर कोणत्या नियम व अटींच्या आधारे त्यांनी ही परवानगी दिली आहे, असा मुद्दा सध्या उपस्थित होत आहे.

पनवेल महापालिकेला एमएसआरडीसीच्या नोटिसीबाबत विचारणा केली असता, एमएसआरडीसीकडे या संपूर्ण प्रकाराबाबत पत्रव्यवहार करण्यात येणार असल्याचे सांगितले. पुणे-मुंबई राष्ट्रीय महामार्ग ४८ वर मुंबई व पुणेमार्गी केवळ संपादित शासकीय जागेत अतिक्रमण करून अनधिकृत बोर्ड, होर्डिंग्ज लावल्या असल्याचे या कार्यालयाच्या निदर्शनास आले आहे. हे बोर्ड आणि होर्डिंग्ज अनधिकृत असून, धोकादायकही आहेत. त्यामुळे जीवितहानी होण्याची शक्यता असल्याने हे बोर्ड व होर्डिंग्ज त्वरित काढावेत, अन्यथा एमएसआरडीसी कार्यालय कोणतीही पूर्वसूचना न देता ते हटवून जप्त करेल, असे या नोटीसमध्ये त्यांनी नमूद केले आहे.

# चार वाहनांच्या विचित्र अपघातात दोघे जखमी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलजवळील मुंबई-पुणे महामार्गावरील मुंबई लेनवर खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीत चार वाहनांच्या झालेल्या विचित्र अपघातात दोन जण जखमी झाल्याची घटना घडली आहे.



कंटेनर क्रमांक एमएच-१४-एलबी-२४५५ वरील चालक सुनील जाधव (वय ३६ वर्ष रा.चाकण) यांचा कंटेनर नादुरुस्त झाला होता. सदर ठिकाणी मेकॅनिक अखिलेश सरोज (वय ३८ वर्ष रा.विक्रोळी मुंबई) व राजेंद्र कुमार उर्फ पप्पू (वय २८ वर्ष रा.भिवंडी) हे काम करीत होते. मेकॅनिक घेवुन आलेले व्हॅगनर कार कंटेनरच्या पुढे उभी केली होती. त्याचवेळी पाठीमागून येणारा ट्रकवरील चालक योगेश घोडके (वय ३२ वर्ष रा जळकोड) या ठिकाणी आले असता समोर तिसर्या लेनला उभा असलेला कंटेनर दिसून न आल्याने समोरील उभ्या असलेल्या कंटेनरला मागून धडकून पहिल्या लेनच्या रोलिंगमध्ये जावुन अडकला.

त्याचवेळी ट्रकच्या मागून येत असलेला पिअकप टेम्पो वरील चालक जितेंद्र अच्छेचे लाल कुमार (वय २४ वर्ष रा.कांदिवली) याला पिअकप टेम्पो कंट्रेल न झाल्याने समोरील ट्रकला पाठीमागून ठोकर मारून गंभीर अपघात झाला. या अपघातात कंटेनरचे काम करणारे मेकॅनिक यांच्या डोक्यास गंभीर दुखापत झाली आहे.



# दुचाकी चोरणारा पोलिसांच्या सतर्कतेमुळे अटकेत



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरात दुचाकी चोरुन तीचा वापर करत असलेल्या एका सराईत गुन्हेगारास पनवेल वाहतूक शाखा पोलिसांच्या सतर्कतेमुळे अटक करण्यात आली आहे.

नवीन पनवेल आदई सर्कल पुढे बालाजी सिंफनी येथे पनवेल वाहतूक शाखेचे पो. हवा.अमीर मुलाणी हे वाहतूक नियमन करत असताना एक दुचाकी वाहन चालक हेल्मेट परिधान न करता वाहन चालवित असल्याने त्याच्यावर कारवाई करतांना` सदर गाडी चोरीस गेल्याचे निष्पन्न झाले.

याबाबत तात्काळ पनवेल शहर पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्यात आला. वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोहवा अमोल पाटील, म्हात्रे, महेश पाटील पाटील, विशाल दुधे, वायकर, नितीन वाघमारे, पो.ना.देशमुख, मिथुन भोसले, पो.शि.कराड आर्दीच्या पथकाने सदर ठिकाणी जावून आरोपी राहुल कांबळे (२४ रा.कोप्रोली) याला ताब्यात घेतले. अधिक चौकशीमध्ये त्याने जुनेद ताडे यांनी पळस्पे फाटा येथील जनता चिकन मटण शॉप समोर उभी करून ठेवलेली होंडा अ‍ॅक्टीव्हा गाडी चोरली होती व ती गाडी घेवून तो फिरत असताना पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले आहे.



**पनवेल : भाजप उलवे नोड २चे उपाध्यक्ष संदीप म्हात्रे यांना ५०व्या वाढदिवसानिमित्त भाजप खारकोपर अध्यक्ष सुधीर ठाकूर, सुहास भगत, गजानन घरत, गोपाळ भगत, व्ही.के. ठाकूर, रामदास घरत, कैलास घरत यांनी शुभेच्छा दिल्या.**

# बंद दिव्यांमुळे आसूडगाव-खांदा कॉलनी रस्त्यावर अंधार

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली सर्कल ते पनवेल शहराकडे जाणार्या मुख्य महामार्गालगत असणाऱ्या आसूडगाव ते खांदा कॉलनी या रस्त्याच्या दुतर्फा उभारण्यात आलेले विजेचे खांब महानगरपालिकेच्या प्रयत्नांतून उभारण्यात आले. काही दिवस हे विजेचे खांब सुरू होते, मात्र सध्या कळंबोली सर्कल या ठिकाणी केंद्र सरकारच्या सुरू असलेला रस्त्याच्या कामामुळे हे वीज खांब नादुरुस्त झाले आहेत. त्यामुळे या रस्त्यावर संध्याकाळनंतर अंधार पसरत आहे. येथे पसरत असलेल्या अंधारामुळे या मार्गावर काळोखात अपघात होत असल्याने येथील नागरिकांसह प्रवासी व वाहनचालक नाराजी व्यक्त करू लागले आहेत.

येथील नागरिकांनी पनवेल महानगरपालिकेकडे वारंवार केलेल्या मागण्यांनंतर या रस्त्याच्या दुतर्फा विद्युत खांब उभारले होते. त्यामुळे हा भाग रात्रीच्या वेळी लख्ख प्रकाशाने उजळून निघत होता. त्यामुळे वाहतूकदारांना तसेच नागरिकांना येथून ये-जा करताना दिलासा मिळत होता. मात्र, गेल्या काही दिवसांपासून या विद्युत खांबावरील दिवे बंद असल्याने येथून ये-जा करताना विविध अडचणींचा सामना करावा लागत असल्याने प्रशासनाने या रस्त्यावरील दिवे सुरू करावेत, अशी मागणी येथील नागरिक करत आहेत.

**या मार्गावर नागरिकाच्या सेवेसाठी विजेचे खांब उभारण्यात आले होते, मात्र रस्त्याच्या नवीन प्रकल्पाच्या कामामुळे हे पोल आता नादुरुस्त अवस्थेत आहेत. हे सत्य असले तरी त्याचे काम आता आमच्या हातात नाही.**
**-प्रीतम पाटील, विद्युत अधिकारी, पनवेल मनपा**

# कळंबोलीतल्या भिंती करताहेत समाजप्रबोधन

## पनवेल महानगरपालिकेचा एक आदर्शवत उपक्रम

**कळंबोली : बातमीदार**

भिंतींना कान असतात ही म्हणून सर्वश्रुत आहे, पण भिंती आता बोलूही लागतात अन समाजप्रबोधनाचे कामही करू लागतात असं म्हटलं तर वावग ठरणार नाही .कळंबोली वसाहती मधील फुटपाथला लागून असलेल्या भिंतीवर महापालिकेच्या वतीने विविध स्लोगन, म्हणी व समाज प्रबोधन घडवणाऱ्या सुंदर अद्याक्षरांनी कळंबोलीतल्या भिंती आता बोलू लागल्या आहेत. आकर्षक ,समाज प्रबोधन करणाऱ्या या रंगीबेरंगी शब्दांची भुरळ कळंबोली वासियांना पडली आहे. समाज व्यवस्थेबाबत जळजळीत अन शिकाऊ अंजन घालणाऱ्या या भिंती सर्वांचेच लक्ष वेधून घेत आहेत. नागरिकांनी महापालिकेच्या या विशेष उपक्रमाचे कौतुक केले आहे.




महापालिकेच्या वतीने स्वच्छ कळंबोली सुंदर कळंबोली चा नारा देत कळंबोलीतील पोस्ट कार्यालय ते सुधागड विद्या मंदिराजवळच्या रस्त्याच्या दुतर्फा पदपथाच्या बाजूला असलेल्या गृहनिर्माण संस्थांच्या भिंतींना चांगले दिवस व त्यांचे रूपच पालटून जात आहे. केंद्र शासनाच्या व महापालिकेच्या स्वच्छ भारत मिशनच्या अंतर्गत कळंबोलीतील पदपथाला लागून असलेल्या भिंतींची रंगरंगोटी करून त्यावर विविध प्रकारच्या समाज प्रबोधन करणाऱ्या अद्याक्षरे ,विविध चित्रांनी भिंती रंगीबिरंगी झाल्याने भहरल्या आहेत. या भिंतीवर पाणी वाचवा देश वाचवा, झाडे लावा झाडे जगवा, स्वच्छता असेल जिथे आरोग्य वसेल तिथे , मंत्र सुखाचा एक खरा जलसाक्षरतेची कास धरा, साक्षरतेचा एकच मंत्र शिक्षण देणे हे एकच तंत्र, स्वच्छतेच्या नियमांचे पालन करू घर अंगण परिसर स्वच्छ करू,तंबाखूमुक्त समाज ,सहित विविध प्रकारच्या समाज प्रबोधन व समाज हीच जपणाऱ्या अद्याक्षरे व वाक्यांनी कळंबोलीतील भिंतीं ही समाजकार्याचा वसा घेत उभ्या आहेत.

महापालिकेच्या या नवीन उपक्रमाचे कळंबोलीतील नागरिकांनी ही स्वागत करून महापालिकेला धन्यवाद दिले आहेत .भिंतींवर सुबक व दर्जेदार लिखाणाने कळंबोलीचाच चेहरा मोहरा आता पालटून जात आहे .एकीकडे स्वच्छतेचा घेतलेला वसा आणि त्या स्वच्छतेलाच दर्जेदार अशा रंगीबेरंगी सुबक कलाकृती या भिंतीवर रेखाटल्याने कळंबोलीचेच रुपडे आता पालटू लागले आहे .याचे सर्व श्रेय हे पनवेल महानगरपालिका प्रशासनाला द्यावे लागेल. त्यांच्या या कल्पकतेतून कळंबोलीला एक आगळे वेगळे रूप आता मिळणार आहे.

या महापालिकेच्या उपक्रमातून कायमस्वरूपी प्लास्टिकचे बॅनर लावण्याऐवजी भिंतीवर कलात्मक दर्जेदार हस्ताक्षराने काम करण्याची किमया महेंद्र पेंडूरकर हा दर्जेदार कलाकार आपली कला या भिंतीवर रेखाटत आहे. नेटवरूनच विविध प्रकारचे समाज प्रबोधन करणाऱ्या वाक्यांची तो माहिती घेऊन समाज मन आणि समाज प्रबोधन करणाऱ्या अक्षरे भिंतीवर चांगल्या प्रकारे रेखाटून आपल्याही कलेचा दर्जा हा कलाकार दाखवून देत आहे. एक प्रकारे या कलाकारांच्या हातालाही या महापालिकेच्या स्तुत्य उपक्रमाने कामही मिळाल्याचे त्यांनी सांगितले आहे.

**केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अन स्वच्छता मिशन या उपक्रमांतर्गत महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनानुसार कळंबोलीतील काही परिसरातील पदपथाच्या बाजूच्या भिंतीवर सुबक आकर्षक कलाकृती रेखाटून त्या माध्यमातून जनजागृतीकरिता महापालिकेचा एक अभिनव उपक्रम आहे. यातून निश्चितच समाज प्रबोधनासोबत समाजहित जपण्याचेही काम महापालिका प्रशासनाकडून करण्यात येत आहे.**
**-डॉ. वैभव विधाते, उपायुक्त, पनवेल महानगरपालिका**

# दीपक फर्टिलायझर्सकडून ४१ गावांमध्ये आरोग्यसेवा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दीपक फर्टिलायझर्स अँड पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन लिमिटेडने ग्रामीण भागातील नागरिकांसाठी दर्जेदार वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. कंपनीच्या दोन फिरत्या दवाखान्यांच्या माध्यमातून पनवेल तालुक्यातील तळोजा एमआयडीसी आणि परिसरातील ४१ गावांमध्ये आरोग्यसेवा पुरवली जात आहे.

आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये या उपक्रमांतर्गत २७,८१८ हून अधिक रुग्णांना सेवा देण्यात आली आहे. विशेषतः मर्यादित आरोग्य सुविधा असलेल्या नागरिकांसाठी या फिरत्या दवाखान्यांनी प्राथमिक आरोग्यसेवा सहज उपलब्ध करून दिली आहे. गेल्या चार वर्षांत ८०,००० हून अधिक रुग्णांनी या सुविधेचा लाभ घेतला आहे.

आरोग्यसेवा अधिक प्रभावी करण्याच्या दृष्टीने दीपक फर्टिलायझर्सने तळोजा एमआयडीसीमधील देवीचा पाडा गावात पॅथॉलॉजी संकलन केंद्र सुरू केले आहे. येथे रक्त व मूत्र तपासण्या नाममात्र दरात उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत, ज्याचा परिसरातील ३७ गावे आणि पाड्यातील रहिवाश्यांना थेट फायदा होत आहे.ही सेवा विशेषतः कामगार वर्गासाठी अत्यंत उपयुक्त ठरत आहे, कारण यामुळे वेळेवर आणि परवडणारे निदान व उपचार सहज मिळू शकतात.

या उपक्रमामुळे स्थानिक नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. कुत्तरपाडा गावातील रहिवासी कैलास आदईकर यांनी सांगितले. वर्षानुवर्षे आम्हाला पण दीपक फर्टिलायझर्सच्या फिरत्या दवाखान्यामुळे आता माझ्या कुटुंबाला गावातच नियमित तपासणी आणि औषधोपचार मिळतात. विशेषतः आमच्या गावातील वृद्धांसाठी ही सुविधा जीवनदायी ठरत आहे.तसेच पेंधर गावातील साबिरा ताज यांनी सांगितले कि, मी दोन वर्षांपासून त्वचेच्या समस्येने त्रस्त होते. अनेक ठिकाणी उपचार करूनही काही फरक पडत नव्हता. पण फिरत्या दवाखान्यातील डॉक्टरांनी अचूक निदान करून योग्य औषधोपचार दिले. आता माझी समस्या पूर्णपणे बरी झाली आहे. दीपक फर्टिलायझर्स आणि इशान्या फाउंडेशनच्या सेवेसाठी मी त्यांची आभारी आहे.

दीपक फर्टिलायझर्सच्या कॉर्पोरेट गव्हर्नन्सचे अध्यक्ष नरेश कुमार पिनीसेट्टी म्हणाले की, दुर्गम भागातही दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे हे आमचे ध्येय आहे. आमच्या फिरत्या दवाखान्यांच्या माध्यमातून आम्ही केवळ तात्काळ आरोग्यसेवा पुरवत नाही, तर निरोगी भविष्य घडवण्यासाठी योगदान देत आहोत. दीपक फर्टिलायझर्सच्या समाजकल्याणासाठी असलेल्या दृढ वचनबद्धतेमुळे हजारो लोकांच्या जीवनात सकारात्मक बदल होत आहेत आणि वंचितांसाठी दर्जेदार आरोग्यसेवा प्रत्यक्षात उपलब्ध होत आहे.



## संपादकीय

# मर्यादेचे पालन हवे

वाद निर्माण करून प्रसिद्धीच्या झोतात राहणे ही कार्यपद्धती आजकाल अनेक कथित कलाकार वापरतात. कुणाल कामराही त्यातलाच म्हटला पाहिजे. संविधानाने अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य दिले आहे, मात्र कोणी सुपाऱ्या घेऊन बदनामी करत असेल तर त्याला सोडणार नाही. कामराने माफी मागावी असे स्पष्ट प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या संदर्भात केले आहे. काही राजकीय पक्षांचा अभिव्यक्ती स्वातंत्र्यांच्या बाबतीतला दुटप्पीपणा जनतेच्याही लक्षात आला आहे.

**स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा याच्या सादरीकरणासंदर्भात वाद निर्माण होण्याची ही काही पहिली वेळ नाही. कामराचा अतिरेकी वाचाळपणा समाजमाध्यमांशी परिचित मंडळींना ज्ञात आहेच. यापूर्वीही त्याच्या कंटेंटमुळे मोठे वाद उद्भवले आहेत. पंतप्रधान, मुख्य न्यायाधीश वा न्यायव्यवस्था यांसारख्या आदरणीय उच्च पदस्थ वा संस्थांच्या संदर्भात खालच्या दर्जाची टिप्पणी करण्याचे उद्योग त्याने यापूर्वीही केले आहेत. या वेळी शिवसेनेतील फुटीबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे निर्देश करणारे गाणे त्याने तयार केले. गाण्यात शिंदे यांचा थेट उल्लेख मात्र टाळला. सोमवारी दिवसभर वृत्तवाहिन्या आणि समाजमाध्यमांवर हे गाणे वाजत राहिले. स्वाभाविकच ते व्हायरल झाले. जनतेतून त्यासंदर्भात टीकात्मक प्रतिक्रिया उमटलीच, परंतु दोन्ही सभागृहांनाही त्याची दखल घेणे भाग पडले. राज्याचे मानसिक स्वास्थ्य खराब करणाऱ्यांना सोडणार नाही असा खरमरीत इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात या विषयावरील चर्चेला उत्तर देताना दिला. आपण अभिव्यक्ती स्वातंत्र्य मानणारे आहोत, पण अभिव्यक्ती स्वातंत्र्य स्वैराचाराकडे जात असेल तर ते मान्य होऊ शकणार नाही असे स्पष्ट प्रतिपादन करतानाच बाळासाहेबांचा वारसा एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वातील शिवसेनेला जनतेने निवडणुकीत दिला आहे असेही त्यांनी म्हटले. कामराच्या वादग्रस्त गाण्यातील शब्दांची पेरणी ठाकरे गटाकडून सर्रास केल्या जाणाऱ्या टीकाटिप्पणीशी साधर्म्य असणारी आहे. त्यामुळेच त्याला ही सुपारी नेमकी कुणी दिली याची चर्चा झाली. संजय राऊतांशी त्याची जवळीक असल्याचा उल्लेख झाला. कंगना राणावतच्या घरावर बुलडोझर फिरवल्यावर त्या कारवाईचे कौतुक म्हणून कामराने राऊतांना एका पॉडकास्टमध्ये खेळण्यातले बुलडोझर दिले होते असे सांगितले जाते. आता त्याच्या या वादग्रस्त गाण्यामुळे मुंबई महापालिकेने संबंधित हॅबिटॅट स्टुडिओ व युनिकॉन्टिनेन्टल हॉटेलवर कारवाईचा बडगा उगारला तेव्हा मात्र त्याला व त्याच्या समर्थकांना अभिव्यक्ती स्वातंत्र्याची आठवण झाली. तत्पूर्वी रविवारी रात्री शिवसेना कार्यकर्त्यांनीही खार येथील या स्टुडिओची मोडतोड केली. या दोन्हीमुळे ही अभिव्यक्ती स्वातंत्र्याची पायमल्ली असल्याचे गळे काढणारेही बोलू लागले. आश्चर्याची बाब म्हणजे ठाकरे गटही या टीकेत सहभागी झाला. याच ठाकरे गटाने यापूर्वी कंगना राणावत, आरजे मलिष्का यांच्यावर सूडबुद्धीने कारवाई केली होती हे जनता विसरलेली नाही. मुंबईत सुरक्षित वाटत नाही. पाकव्याप्त काश्मीरमध्ये असल्यासारखे वाटते अशा आशयाचे विधान कंगनाने केल्यावर तिच्या घरावर थेट बुलडोझर फिरवण्यात आला. आरजे मलिष्काचे 'सोनु तुला बीएमसीवर भरवसा नाय काय' हे विडंबनात्मक गाणे ठाकरे गटाला तेव्हा रुचले नव्हते. लगेचच पालिकेच्या अधिकाऱ्यांनी मलिष्काच्या घरी डेंग्यूच्या अळ्या आढळल्याची नोटीस बजावली होती. मग आता त्यांना आलेला अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा पुळका सोयीस्कर नाही तर कसा म्हणायचा? अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा आदर राखला गेला पाहिजे हे कुणीही नाकारणार नाही, परंतु सगळ्यांनीच घटनेने दिलेल्या अधिकाराचा मर्यादेत राहून वापर करणेच अभिप्रेत आहे.**

# प्रसिद्धी पराङ्मुख कवी व गीतकार ग्रेस



ती गेली तेव्हा रिमझिम पाऊस निनादत होता... या काव्याने घरोघरी पोहचलेले माणिक गोडघाटे ऊर्फ कवी ग्रेस हे मराठी कवितेच्या प्रांतावर मौलिक ठसा उमटवून गेले....

कवी ग्रेस यांची मर्ढेकरोत्तर नव कवींच्या दुसऱ्या पिढीतील प्रमुख कवींमध्ये गणना होते. ग्रेस मूळचे नागपूरचे. त्यांचा जन्म १० मे १९४०चा. त्यांचे वडील सैन्यात होते. नागपुरातील कर्नल बाग परिसरात त्यांचे बालपण हलाखीच्या परिस्थितीत गेले. आईच्या अकाली निधनामुळे नोकरी व शिक्षण यांच्यात मेळ साधत त्यांना आपली प्रतिभा जपावी लागली. १९६६मध्ये ते नागपूर विद्यापीठातून मराठीमध्ये एमए झाले. त्यानंतर दोन वर्षं त्यांनी धनवटे नॅशनल कॉलेजमध्ये अधिव्याख्याता म्हणून नोकरी केली. १९६८पासून १९९७ साली निवृत्त होईपर्यंत ते नागपूरमधील वसंतराव नाईक समाजविज्ञान संस्थेत (मॉरिस कॉलेज) मराठीचे प्राध्यापक होते. निवृत्तीनंतर काही काळ ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाच्या मराठी विभागात सौंदर्यशास्त्र या विषयाचे अध्यापनही करीत होते. ग्रेस यांच्या लिखाणाला सुरुवात झाली १९५५ सालापासून. 'छंद', 'सत्यकथा' या नियतकालिकांमधून त्यांच्या कविता सुरुवातीला प्रसिद्ध झाल्या. १९६७ साली त्यांचा पहिला काव्यसंग्रह 'संध्याकाळच्या कविता' प्रसिद्ध झाला. त्यांचे समकालीन कवितेत असलेले वेगळेपण या कविता संग्रहामुळे अधोरेखित झाले. मुक्तछंदाचा प्रभाव असणाऱ्या या काळात ग्रेस यांनी निष्ठेने वृत्तबद्ध आणि नादानुसारी लयविभोर काव्यरचना केली. त्यामुळे त्यांची कविता सौंदर्यवादी असूनही तिला अभिजाततेची वैशिष्ट्यं प्राप्त झाली. यानंतर प्रसिद्ध झालेल्या राजपुत्र आणि डार्लिंग (१९७४), चंद्रमाधवीचे प्रदेश (१९७७), सांध्यपर्वातील वैष्णवी (१९९५), सांजभयाच्या साजणी (२००६) आदी संग्रहांमधून त्यांची कविता अधिक गूढ आणि व्यामिश्र होत गेलेली जाणवते. ग्रेस हे विलक्षण आत्ममग्न कवी होते. ग्रेस एक बेट आहे आणि या बेटाला समजून घेण्यासाठी त्या बेटावरच यावे लागते असे ग्रेस वारंवार म्हणायचे. ग्रेस यांचे मराठीसोबत इंग्रजी व उर्दू भाषांवर प्रभुत्व होते. त्यांच्या कवितांमधून याचा प्रत्यय येतोच, पण त्यांच्या व्याख्यानांमधे व पंडित हृदयनाथ मंगेशकर यांच्यासोबत त्यांनी केलेल्या कार्यक्रमांमधूनही त्यांच्या प्रखर वाणीचा अनुभव रसिकांना येत असे. ग्रेस यांच्या काव्याइतकीच मोहिनी त्यांच्या ललित लेखनानेही वाचकांच्या मनावर घातली आहे. 'चर्चबेल' हा त्यांचा पहिला ललित लेख संग्रह १९७४मध्ये प्रकाशित झाला. त्यानंतर 'मितवा', 'संध्यामग्न पुरुषाची लक्षणे', 'मृगजळाचे बांधकाम', 'वाऱ्याने हलते रान', 'ओल्या वेळूची बासरी' हे त्यांचे ललित लेख संग्रह प्रसिद्ध झाले आहेत. माणिक गोडघाटे यांनी कवी म्हणून 'ग्रेस' हे नाव धारण करण्यामागे कारण ठरली ती लोकप्रिय पाश्चात्त्य अभिनेत्री इन्ग्रीड बर्गमन.

'द इन ऑफ द सिक्स्थ हॅपिनेस' या चित्रपटात इन्ग्रीडसंबंधी 'शी इज इन ग्रेस' असं वाक्य उच्चारलं जातं. हे वाक्य ऐकल्यानंतर आपल्या आत्म्यावरची धूळ उडाली आणि आपल्याला प्रतिभेचा पहिला साक्षात्कार झाला, असे ग्रेस यांनी म्हटले आहे. त्यांना अनेक पुरस्कार, मान-सन्मान मिळाले. ग्रेस यांचे २६ मार्च २०१२ रोजी निधन झाले.


(साभार : बाईट्स ऑफ इंडिया)

# प्रयोगशील संगीतकार आनंद शंकर

आनंद शंकर यांचा जन्म उत्तर प्रदेशातील (सध्याचे उत्तराखंड) अल्मोडा येथे प्रख्यात बंगाली संगीतकार कुटुंबात झाला. त्यांचे वडील प्रख्यात शास्त्रीय नर्तक उदय शंकर आणि आई अमला शंकर होते. त्यांच्या बहिणीचे नाव ममता शंकर होते. ते प्रसिद्ध सतार वादक पं. रविशंकर यांचे पुतणे होते.

आनंद शंकर यांनी आपल्या काका पं. रविशंकर यांच्याऐवजी वाराणसीचे डॉ. लालमणी मिश्रा यांना संगीत शिक्षणासाठी गुरु म्हणून निवडले होते. नंतर त्याने तनुश्री शंकरशी लग्न केले. त्यांचे शिक्षण ग्वाल्हेर (मध्य प्रदेश)मधील सिंधिया स्कूलमध्ये झाले. भारतीय संगीत शैलींमध्ये पाश्चात्य संगीत शैलीचे उत्कृष्ट मिश्रण मिसळून त्यांनी संगीताला एक नवीन रूप दिले.

आनंद शंकर यांनी १९६०च्या दशकात लॉस एंजेलिसचा दौरा केला. येथे त्यांनी रॉक संगीतकार 'जिमी हेंड्रिक्स' सारख्या पाश्चात्य संगीत दिग्गजांसोबत काम केले. वयाच्या अवघ्या २७व्या वर्षी १९७० साली त्यांचा पहिला संगीत अल्बम प्रसिद्ध झाला. इथेच



त्यांनी सतारीवर आधारित 'रोलिंग स्टोन्स', 'जम्पिन जैक फ़्लैश' व 'लाइट माय फायर' यासारख्या वेस्टर्न हीट केल्या की ज्या खूप लोकप्रिय झाल्या. भारतात परतल्यावर, आत्मविश्वासाने भरलेल्या शंकर यांनी संगीतातील प्रयोग सुरूच ठेवला. १९७५ साली आनंद शंकर यांनी किबोर्ड आणि पारंपारिक भारतीय वाद्यांच्या माध्यमातून 'आनंद शंकर अँड हिज म्युझिक' अल्बमद्वारे संगीतात विशेष योगदान दिले. १९७८ ते १९८१पर्यंत त्यांनी इंडियन रिमेम्बर्स एल्विस, ए म्यूजिकल डिस्कवरी ऑफ इंडिया, मिसिंग यू, स्पेस थीम्ड-२००१, जंगल सफारी-तिन्नगेड सा-रे-गा मचन असे पाच खास अल्बम काढले. १९९०च्या दशकात जेव्हा डीजेची संस्कृती तयार होऊ लागली, तेव्हा आनंद शंकर यांनी डिस्कोला अनुरूप संगीत देण्यास सुरुवात केली. १९९६ मध्ये 'ब्लू नोट्स' अंतर्गत 'ब्ल्यू ज्यूस व्हॉल्यूम १' नावाचा त्यांनी नवीन अल्बम केला. नंतर त्यांचे स्ट्रीट्स ऑफ कलकत्ता व डांसिंग ड्रम्स हे दोन अल्बम प्रसिद्ध झाले. त्यांचा सर्वात लोकप्रिय अल्बम होता 'आनंद शंकर अँड हिज म्युझिक', ज्यामध्ये एकाच वेळी सितार, गिटार, तबला, मृदंगम, ड्रम आणि मोग सिंथेसाइझर्सचा समावेश होता. हाच अल्बम २००५ साली त्यांच्या मरणोत्तर पुन्हा लाँच केला गेला.

'दूरदर्शन'वरील लोकप्रिय मालिका 'व्योमकेश बक्षी'ला त्यांनी संगीत दिले होते. २०१० आणि २०११ या वर्षात आनंद शंकर यांचे संगीत एनबीसीवर प्रसारित झालेल्या लोकप्रिय कॉमेडी शोच्या अनेक भागांमध्ये दाखवले गेले होते. आनंद शंकर यांचे २६ मार्च १९९६ रोजी निधन झाले.

**-संजीव वेलणकर (मराठीसृष्टी)**



## बदलते तंत्रज्ञान

# मोबाईल फोन खूप गरम झाल्यास या टिप्स करा फॉलो!



गेल्या काही वर्षांत स्मार्टफोनचा वापर खूप वाढला आहे, पण अनेक वापरकर्ते फोन गरम झाल्याची तक्रारही करतात. हा त्रास सहसा फोनच्या अतिवापराने वाढतो, मात्र पण सध्या फोनवर असलेल्या सुविधा पाहता फोनचा वापर करणे आवश्यकच असते.

जर तुमचा फोन थोडा वेळ वापरल्यानंतर खूप गरम होत असेल तर तुम्हाला काही पद्धती वापराव्या लागतील, ज्याद्वारे तुम्ही फोन तापण्यापासून वाचवू शकता. या समस्येवर अगदी सहज मात करता येऊ शकते. यासाठी सोप्या टिप्स फॉलो करा.

**फोनच्या ब्राइटनेस वर लक्ष ठेवा**

फोनचे तापमान कमी ठेवण्यासाठी तुम्ही प्रथम तुमची स्क्रीन ब्राइटनेस ऑप्टिमाइझ करणे आवश्यक आहे. आजकाल बरेच स्मार्टफोन अधिक ब्राइटनेस सपोर्टसह येतात. गरज नसताना तुम्हाला तो कमी ठेवावा लागेल. त्याने फोन कमी गरम होईल आणि बॅटरी लाइफ वाढेल.

**अनावश्यक ॲप्स बंद ठेवा, अनइन्स्टॉल करा**

जर फोनमध्ये खूप ॲप्स असतील तर तुमचा फोन गरम होऊ शकतो, कारण अनेक ॲप्स बॅकग्राउंडमध्ये काम करत राहतात आणि प्रोसेसर वापरला जातो. या कारणास्तव फोनचे बॅकग्राउंड ॲप्स क्लियर करत राहा आणि फोनमधून अनावश्यक ॲप्स अनइस्टॉल करा.

**फोनवर गेमिंग सेशनचा वेळ कमी करा**

आजकाल बरेच लोक गेम खेळण्यासाठी फोनचा वापर करतात. मिड-रेंज आणि लो-बजेट स्मार्टफोनमध्ये हेवी गेम्स खेळल्याने फोन गरम होतो. हे टाळण्यासाठी तासनतास गेम्स खेळणे टाळा. याशिवाय थेट सूर्यप्रकाशात फोन ठेवणेही पूर्णपणे टाळा.

**चार्जिंग करताना काळजी घ्या**

फोन चुकीच्या पद्धतीने चार्ज केला तरीही तो गरम होतो. जर तुमचा फोन चार्जिंगदरम्यान खूप गरम होत असेल तर तुम्हाला ब्रँडेड चार्जर वापरावे लागेल. याशिवाय तुमचा फोन लेटेस्ट व्हर्जनमध्ये अपडेट नसेल तर तो अपडेटही करावा.

# प्रतिभावान कवयित्री महादेवी वर्मा

हिंदीतील प्रतिभावान कवयित्री महादेवी वर्मा यांचा २६ मार्च हा जन्मदिन. गीतकार व संगीतकार आनंद शंकर यांचा २६ मार्च जन्मदिन. त्या निमित्ताने, त्यांचा हा अल्प परिचय... २६ मार्च १९०७ रोजी महादेवी वर्मा यांचा जन्म झाला. महादेवी वर्मा यांचे प्राथमिक शिक्षण इंदुरातल्या मिशन शाळेत सुरू झाले. बरोबरच संस्कृत, इंग्रजी, संगीत आणि चित्रकलेचे शिक्षण शिक्षक घरी येऊन देत असत. १९१९मध्ये अलाहाबादमधल्या क्रास्थवेट कॉलेजात प्रवेश घेऊन त्या १९३२मध्ये अलाहाबाद विश्वविद्यालयातून संस्कृत विषयात एमए झाल्या. महादेवींचे कार्यक्षेत्र लेखन, संपादन व अध्यापन हे होते.

अलाहाबादच्या प्रयाग महिला विद्यापीठाच्या विकासकार्यात त्यांचा मोठा सहभाग होता. त्या काळात हे काम म्हणजे महिला क्षेत्रात क्रांती घडविणारे पाऊल होते. या विद्यापीठाच्या त्या प्रधानाचार्य व कुलगुरूही होत्या. १९३२मध्ये त्या चाँद या एका महिलांच्या मासिकाच्या मुख्य संपादक झाल्या. त्यांना हिंदी साहित्य जगतातील छायावादी युगाच्या चार प्रमुख स्तंभांपैकी एक समजले जाते.

आधुनिक हिंदीच्या समर्थ कवयित्री असल्यामुळे त्यांना 'आधुनिक मीरा'पण म्हटले जाते. कवी निराला ह्यांनी तर त्यांचा हिंदीच्या विशाल मंदिरातील सरस्वती असा उल्लेख केला आहे. महादेवी वर्मा



## निमित्त

संगीतातही निपुण होत्या. त्याचबरोबर कुशल चित्रकार व सर्जनशील अनुवादकही होत्या. त्यांना हिंदी साहित्यातील सगळ्याच मोठ्या पुरस्कारांनी गौरविले गेले होते. १९५६मध्ये भारत सरकारने त्यांना पद्मभूषण पुरस्काराने गौरविले. १९७९मध्ये त्या साहित्य अकादमीच्या पहिल्या महिला सदस्य होत्या. भारत सरकारने त्यांना मरणोत्तर पद्मविभूषण देऊन गौरविले. 'यामा' नामक काव्य संकलनासाठी त्यांना 'ज्ञानपीठ पुरस्कार' देण्यात आला. १९६८मध्ये सुप्रसिद्ध चित्रपट निर्माते मृणाल सेन ह्यांनी त्यांच्या स्मरणार्थ 'वह चीनी भाई'वर 'नील आकाशेर नीचे' नामक एक बंगाली चित्रपटाची निर्मिती केली.

१६ सप्टेंबर १९९१ रोजी भारत सरकारने महादेवी वर्मांच्या सन्मानार्थ जयशंकर प्रसादांसमवेत दोन रुपयांचे एक पोस्टाचे तिकीट प्रकाशित केले. त्यांच्या 'अतीत के चलचित्र' या पुस्तकाचा मराठी अनुवाद 'बिंदा, सांबिया आणि...' या नावाने प्रकाशित झाला आहे. महादेवी वर्मा यांचे निधन ११ सप्टेंबर १९८७ रोजी झाले.

गद्यलेखनात महादेवी अवतीभवतीची माणसं, प्राणी-जगत, तत्कालीन साहित्यिक घडामोडी, साहित्यिक विचारधारा, आपली एकूणच शिक्षण पद्धती- या सर्वाचं सजग, चौफेर दर्शन घडवतात. महादेवी वर्माच्या गद्य साहित्यात- 'प्रतितके चलचित्र' (१९४३), 'स्मृतिकि रेखाएँ' (१९४३), ही शब्दचित्र, 'पथके साथी' (१९५६), 'मेरा परिवार' (१९७२), 'संस्मरण' (१९८३) ही संस्मरण आठवली आहेत. त्यांनी वेळोवेळी केलेल्या भाषणांचे संकलन- 'संभाषण' (१९७४) हे तर त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक, साहित्यविषयक आणि एकूणच स्त्रीविषयक विचारांचे उत्कृष्ट संकलन आहे. या व्यतिरिक्त 'शृंखलाकी कडियाँ', 'साहित्यकारकी आस्था तथा अन्य निबंध', 'संकल्पित' हे लेखसंग्रह आणि 'क्षणदा' हा ललितलेखसंग्रह- हे सारेच महादेवींच्या साहित्याची, त्यांच्या विचारधारेची परिपूर्ण ओळख करून देणारे गद्यसंग्रह आहेत.

**(साभार : इंटरनेट)**

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# 'हे' घरगुती पदार्थ बद्धकोष्ठतेवर रामबाण उपाय

बद्धकोष्ठतेला हलक्यात घेणे तुम्हाला महागात पडू शकते. कधीकधी दीर्घकालीन बद्धकोष्ठतेमुळे मूळव्याध,



फिस्टुला, फिशर किंवा गंभीर आतड्यांसंबंधी रोग होऊ शकतात. बद्धकोष्ठतेपासून आराम मिळवण्यासाठी अनेक औषधे आणि उपचार उपलब्ध आहेत, परंतु काही घरगुती उपायांनी तुम्ही या समस्येपासून आराम मिळवू शकता. पोषणतज्ज्ञ लवनीत बत्रा असेच काही नैसर्गिक उपाय सांगत आहेत, ज्यामुळे जुनाट बद्धकोष्ठता सहज दूर होऊ शकते.

**दही व आळशी** : दह्यात बिफिडोबॅक्टेरियम लॅक्टिस नावाचे प्रोबायोटिक असते. हे पचनसंस्थेला दुरूस्त करण्यास मदत करते. आळशीबाबत बोलायचे झाल्यास त्यात विद्राव्य तंतू आढळतात. फायबर पाण्यात विरघळते, ज्यामुळे बद्धकोष्ठतेपासून आराम मिळतो.

**आवळा** : आवळा केवळ बद्धकोष्ठतेपासून आराम देत नाही तर अनेक आरोग्य समस्या दूर करण्याची क्षमता देखील त्यात आहे. आवळ्याचा ३० मिली रस सकाळी एक ग्लास पाण्यात मिसळून प्यायल्याने पचन सुधारते आणि बद्धकोष्ठतेपासून आराम मिळतो.

**तूप** : हे ब्युटीरिक ॲसिडचा एक उत्तम स्रोत आहे. ज्याने आतड्यांतील चयापचय सुधारते आणि मल बाहेर पडण्याच्या हालचालीत मदत करते. रात्री झोपताना एक कप कोमट दुधात एक चमचा तूप मिसळणे हा बद्धकोष्ठता कमी करण्याचा प्रभावी उपाय आहे.

**हिरव्या पालेभाज्या** : पालक, ब्रसेल्स स्प्राउट्स आणि ब्रोकोली यांसारख्या पालेभाज्या केवळ फायबरने भरलेल्या नसतात, तर त्यामध्ये फोलेट तसेच जीवनसत्त्वे सी आणि के देखील असतात. हे सर्व घटक आतड्यांच्या कार्याला चालना देण्यासाठी उपयुक्त आहेत.

**पुरेसे पाणी प्या** : बद्धकोष्ठता टाळण्याचा किंवा त्यापासून आराम मिळवण्याचा सर्वात स्वस्त आणि सोपा मार्ग म्हणजे भरपूर पाणी पिणे. पाण्याव्यतिरिक्त इतर द्रवपदार्थदेखील बद्धकोष्ठता सुधारतात. एकूणच, फायबरयुक्त पदार्थ आणि पाण्याचे सेवन हा बद्धकोष्ठतेपासून मुक्त होण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे.

**टीप : हा लेख फक्त सामान्य माहितीसाठी आहे. हा कोणत्याही प्रकारे एखाद्या औषधाचा किंवा उपचारांचा पर्याय असू शकत नाही. अधिक माहितीसाठी नेहमी आपल्या डॉक्टरांचा सल्ला घ्या.**

# ग्रामपंचायत निवडणुका एप्रिल अखेरीस

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील राजकीय पक्ष आणि कार्यकर्त्यांची प्रतिक्षा संपणार आहे. जिल्हयातील ३५१ ग्रामपंचायतींच्या मतदारयाद्या अद्ययावत करण्याचा कार्यक्रम सुरू झाला असून प्रशासकीय यंत्रणा कामाला लागली आहे. प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या प्रसिदध करण्याची तयारी अंतिम टप्प्यात आहे. त्यानंतर एप्रिलअखेर ग्रामपंचायतींचे बिगुल वाजण्याची शक्यता आहे. डिसेंबर २०२५ पर्यंत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतीच्या प्रभाग रचनेचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.

ग्रामपंचायत निवडणूकांकडे जिल्हा परिषद निवडणूकांची रंगीत तालीम म्हणून पाहिले जाते. थेट जनतेतून सरपंच निवडून येणार असल्याने सरपंचपदाची निवडणूक जिंकून ग्रामपंचायतीवर एकहाती सत्ता मिळवण्याचा मोठ्या राजकीय नेत्यांचा नेहमीच प्रयत्न राहिला आहे.

ग्रामपंचायतींच्या निवडणुका मागील काही वर्षांपासून रखडल्या आहेत. त्यामुळे संपूर्ण कारभार प्रशासकाच्या हाती आहे. एका प्रशासनाकडे किमान दोन ते तीन ग्रामपंचायतींचा कारभार असल्याने नागरिकांचाही खोळंबा होत आहे. ग्रामपंचायत निवडणुका कधी होणार, याकडे सर्वच राजकीय पक्षांचे लक्ष लागले आहे.



मागील निवडणुकांमध्ये चुकीची प्रभाग रचना झाल्याने तसेच बहिष्कार व इतर कारणांमुळे ग्रामपंचायतीच्या निवडणुका होऊ शकल्या नाहीत. जिल्ह्यातील अशा २२० ग्रामपंचायतींची सार्वत्रिक आणि १११ ग्रामपंचायतींची पोटनिवडणूक होण्याची शक्यता आहे. त्यानुसार मतदार याद्या अद्यावतीकरणाचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.

विधानसभा निवडणुकीचे पडसाद ग्रामपंचायत निवडणूकांमध्ये राजकीय पक्षांचा थेट संबंध येत नसला तरी ग्रामपंचायतींमध्ये आपल्याच पक्षाचे वर्चस्व असावे यासाठी राजकीय पक्षांचा आटापिटा सुरू असतो. सत्ताधारी किंवा विरोधी पक्ष कोणत्याही एका पक्षाच्या झेंड्याखाली निवडणूक न लढवता स्थानिक विकास आघाड्या स्थापन करून निवडणुका लढविण्याची शक्यता आहे. २०१९ पूर्वी रायगड जिल्ह्यातील ग्रामपंचायतींवर शेतकरी कामगार पक्ष आणि शिवसेनेचे वर्चस्व होते. मात्र अलीकडच्या काळात शेकापला ओहोटी लागल्याचे चित्र आहे.

**इच्छुकांची तयारी सुरू**

गावाच्या विकासाची बहुतांश सूत्रे ही सरपंचाच्या हातात असल्याने ग्रामपंचायतीच्या निवडणुकांना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे.

| तालुका | सार्वत्रिक | पोटनिवडणूक |
|---|---|---|
| अलिबाग | ३४ | ०७ |
| मुरूड | ०४ | ०३ |
| पेण | १८ | ०७ |
| पनवेल | १५ | ०२ |
| उरण | ०८ | ०२ |
| कर्जत | ३० | ०७ |
| खालापूर | ०३ | ०२ |
| रोहा | ०६ | ०५ |
| सुधागड | ०६ | ०२ |
| माणगाव | २१ | १२ |
| तळा | १८ | ०४ |
| महाड | ३० | २५ |
| पोलादपूर | ०० | १२ |
| श्रीवर्धन | १६ | ०९ |
| म्हसळा | ११ | १२ |
| **एकूण** | **२४०** | **१११** |

**मतदारयाद्या अचूक व दोषविरहित असणे आवश्यक असून यात राजकीय पक्षांची भूमिका महत्त्वाची आहे. सर्व मतदारयादीभागाची बीएलओ व राजकीय पक्ष यांनी नेमलेले बीएलए यांच्यामार्फत पडताळणी केली जाईल. यामुळे यादीतील मयत, स्थलांतरित, दुबार मतदार वगळणे, मतदारांच्या तपशीलात दुरुस्ती करणे अधिक सुलभ होईल. सर्व राजकीय पक्षांनी या कामास प्राधान्य द्यावे.**
**–किशन जावळे, जिल्हाधिकारी**

विधानसभा निवडणुकीपासूनच याची इच्छुक उमेदवारांकडून पायाभरणी सुरू झाली होती.. त्याचबरोबर प्रशासकीय स्तरावरही निवडणुकांची तयारी सुरू झाली आहे. इच्छुकांनी निवडणूक लढवण्यासाठी लागणारी कागदपत्रे जमवण्याची तयारी सुरू केली आहे.

# सुरेश लाड यांच्याकडून इफ्तार पार्टीतून एकोप्याची भावना



**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत खालापूर विधानसभेचे माजी आमदार सुरेश लाड यांनी यंदाही कर्जत येथील मुस्लिम बांधवांसाठी इफ्तार पार्टीचे आयोजन केले होते. या वेळी दोन्ही समाजाकडून एकमेकांना खजूर भरवून एकोप्याचा संदेश देण्यात आला.

कर्जत सुन्नी जामा मज्जिद येथे झालेल्या या इफ्तार पार्टीस मुस्लिम समाजाचे मौलाना हैदर व येथील बांगी उपस्थित होते, तर सुरेल लाड यांचे कार्यकर्ते असलेले राजू हजारे, मल्हारी माने, तानाजी चव्हाण, रणजित जैन, राजेश लाड, ऋषिकेश दाभाडे, योगेश गंगावणे यांच्यासह मोठ्या संख्येने मुस्लिम आणि हिंदू बांधव उपस्थित होते.

या वेळी सुरेश लाड यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले सर्वांना भेटून आनंदाचा क्षण वाटून घेत आहोत. जुन्या आठवणींना उजाळा देत लाड म्हणाले येथे मशीद होण्यासाठी कोणीच आडकाठी केलेली नाही. हा भाईचारा आम्ही टिकवून आहोत आणि याही पुढे राखला जाईल.

## कर्जतमध्ये दुचाकीचोरी; गुन्हा दाखल

**कर्जत : रामप्रहर वृत्त**

कर्जत तालुक्यातील मौजे चैतन्यछाया अपार्टमेंट ब्राम्हणआळी दहिवली येथे फिर्यादीयांनी त्यांचे मालकीची एकूण ६०,०००/– रुपये व किमतीचे मोटारसायकल त्यांचे बिल्डींगचे पार्कीगमध्ये हॅण्डल लॉक करून लावलेली असताना अज्ञात आरोपीत याने सदरचे मोटारसायकलचाहॅण्डल लॉक तोडून फिर्यादी यांचे संमतीशिवाय लबाडीचे हेतुने स्वत:चे फायदयाकरीता सदरची चोरी करून चोरून नेली. याबाबत कर्जत पोलीस ठाणे मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/स्वप्नील येरुणकर हे करीत आहेत.


**Hiring Audit Staff**
**Fresh/ Experienced Audit staff required for CA firm**
at Hiranandani fortune city , Apollo 206, sector A, Garden enclave, Bhokarpada , Panvel
**Contact: 8390407010**



**हरविले आहे**

मी ग्यानेन्द्र कुमार पटेल वय -५२, राहणार (डी -२०२, तिरुपती कॉम्प्लेक्स को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड , प्लॉट क्रमांक ७ आणि ८, सेक्टर-३६, कामोठे, ता. पनवेल, नवी मुंबई-४१० २०९. माझे या फ्लॅट चे शेअर सर्टिफिकेट नंबर -९९ दि. ०६/०३/२०२५ रोजी हे कोठेतरी पडून हरविले आहे त्याची प्रॉपटी मिसिंग- कामोठे, पोलीस ठाणे- नवी मुंबई येथे नोंद केली आहे, प्रॉपटी मिसिंग रजि नं. ३१४ / २०२५, दिनांक ०७/०३/२०२५ . कोणाला सापडल्यास खालील मोबाइल नंबर ला संपर्क करा -९३२२३४३६३०



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :–

**मौजे – रीस, तालुका – खालापूर, जिल्हा – रायगड**

| भुमापन नं. /हि. नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| २०/४ | ०–३२–६० पो.ख. ०–०१–३० एकूण ०–३३–९० पैकी रस्त्याकरीता संपादीत केलेले क्षेत्र सोडून ०–०८–०० | २.८१ | मे. महालक्ष्मी डेव्हलपर्स तर्फे भागीदार भावेश मनसुखलाल गांगर, राकेश राजकुमार अग्रवाल |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. २५/०३/२०२५.

सही/–
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**

कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट वासुदेव बळवंत फडके नाटयगृहाजवळ अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल
मो. क्र. : ९९३०३६९८६१



**रोहा नगर परिषद**
ता. रोहा, जिल्हा रायगड
पिन कोड – ४०२१०९.

जा.क्र.रोनप/बांवि/ई–निविदा सुचना/१८४४/२०२५ दिनांक:– २५/०३/२०२५

**जाहीर ई–निविदा सूचना**

रोहा नगरपरिषद हद्दीतील विकास कामाकरिता कामाचा अनुभव असणाऱ्या ठेकेदाराकडून विहित नमुन्यात ई–निविदा मागविणेत येत आहेत. सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई–निविदाद्वारे ऑनलाईन पद्धतीने संगणक प्रणालीवर होईल. सदर निविदा सुचना प्रसिद्धी, आवश्यक असणारी कागदपत्रे, शुद्धीपत्र इत्यादी माहिती https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २६/०३/२०२५ रोजीपासून उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. निविदा सादर करण्याची अंतिम तारीख दिनांक ०९/०४/२०२५ रोजी पर्यंत राहील.

सही/–
**(अजयकुमार एडके)**
मुख्याधिकारी
रोहा नगर परिषद



वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी
राम प्रहर



**खोपोली नगरपरिषद, खोपोली**
खुली ई–निविदा सूचना

मुख्याधिकारी, खोपोली नगरपरिषद, खोपोली हे ''खोपोली नगरपरिषद कार्यक्षेत्रातील विंधन विहिरीवरील हातपंपावर व विद्युत पंपिंग यंत्रणेवर जलशुद्धीकरणाकरीता नॉन इलेक्ट्रिक स्वयंचलित ऑनलाईन वॉटर क्लोरीनेशन उपकरणांचा पुरवठा करणे, बसविणे व कार्यान्वित करणे'' या रु. २५,५६,४७०/– अंदाजपत्रकीय रक्कमेच्या कामाकरीता शासकीय नोंदणीकृत, अनुभवी व अर्हताप्राप्त अभिकारक यांसकडुन ब – १ नमुन्यात online पद्धतीने ई–निविदा मागवित आहेत. सदरील कामाची ई–निविदा व आवश्यक सर्व माहिती http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. २६/०३/२०२५ ते दि. ०३/०४/२०२५ या कालावधीत उपलब्ध असेल.

दि.२५/०३/२०२५

सही/–
**उप नगर अभियंता पा.पु.**
खोपोली नगरपरिषद, खोपोली

जा.क्र.केएमसी/पापु/३७१०



**पनवेल महानगरपालिका**
ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र.१२५/१२५/२०२५ दिनांक : २५/०३/२०२५

| अनु.क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव |
|---|---|---|
| १. | निविदा–पमपा/ मातंवि २८२४ /प.क्र.०३/११७/ २०२४–२५ | पनवेल महानगरपालिकेत बायोमेट्रीक मशीन्स खरेदी करणेबाबत (१ वर्ष वॉरंटी व ४ वर्ष देखभाल दुरुस्ती सह असे एकूण १+४=५) वर्षांकरिता) Non Comprehensive |

या निविदेबाबतची विस्तृत माहिती शासनाच्या www.mahatenders.com या संकेतस्थळावर दि. २६/०३/२०२५ ते दि. ०९/०४/२०२५ रोजी दुपारी ०३.३० वाजे पर्यंत उपलब्ध होईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

सही/–
उप आयुक्त (।)
पनवेल महानगरपालिका



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :–

**मौजे–चेरीवली, तालुका–पनवेल, जिल्हा–रायगड**

| भुमापन नं. /हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| २६/२/अ | ०–३८–२० वरकर ०–१९–०० पो.ख. ११–०० **एकूण ०–६८–२० पैकी ०–२०–००** | ९.३७ | १) अंजना रामचंद्र भालेकर उर्फ अंजना लहू पाटील २) प्रगती रामचंद्र भालेकर उर्फ प्रगती समाधान ठाकूर ३) वर्षा रामचंद्र भालेकर उर्फ वर्षा राहूल भगत ४) श्याम सुदाम भालेकर ५) सपना रामचंद्र भालेकर उर्फ स्वप्नाली बळीराम तांबडे |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. २५/०३/२०२५.

सही/–
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**

कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट वासुदेव बळवंत फडके नाटयगृहाजवळ अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल मो. क्र. : ९९३०३६९८६१



**सावधान नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते आहे की, मौजे डेरवली, ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील वर्णनाची शेतजमिन मिळकत खालील प्रमाणे आहे.

**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे – डेरवली, तालुका – पनवेल, जिल्हा – रायगड**

| सर्व्हे नं./गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| १३० | ० | १–०५–७० पो.ख. ०–१४–२० **एकुण क्षेत्र १–१९–९०** | ९.५० |

सबब वरील शेतजमीन मिळकती संदर्भात मे. जिल्हाधिकारी रायगड अलिबाग सो. यांचे न्यायालयात हक्क नोंद अपील क्र.२८७/२०१७, २८८/२०१७, तसेच मा. दिवाणी न्यायालय पनवेल यांच्या न्यायालयात अपील क्र. १८४/२०२३, नूसार आजतागायत न्याय प्रविष्ठ आहे.

सदर मिळकतीमध्ये श्री. बाळाराम (बाळु) नामदेव पाटील व इतर यांचा अविभक्त हिस्सा आहे. त्यामुळे या मिळकतीमध्ये इतर कोणीही त्रयस्थ इसमांनी हक्क व हितसंबंध प्रस्थापीत करू नये. तरीही सबंधीत मिळकती संदर्भात आमचा हिस्सा / हक्क डावलून केलेला करार, लेख, एम.ओ.यु., साठेकरार, खरेदीखत, वा अन्य कोणताही प्रकारचा दस्तऐवज आमच्यावर बंधनकारक राहणार नाही. सदर प्रकरणी वरील कोणत्याही स्वरूपाचा करार केल्यास त्याच्या विरुध्द त्वरीत आवश्यक दिवाणी व फौजदारी स्वरूपाची कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दि. २४/०३/२०२५

सही/–
**श्री. बाळाराम (बाळु) नामदेव पाटील**
राहणार – डेरवली, पोस्ट. पळस्पे, ता. पनवेल, जि. रायगड.
मो. ८८८८८६७६५०/९८३३७३५२४५


## सकलप फाटा येथे अपघातात चालकाचा मृत्यू

**म्हसळा : रामप्रहर वृत्त**

म्हसळा पोलीस ठाणे हद्दीत सोमवार (दि. २४) रोजी, श्रीवर्धन येथुन बॉक्साईड भरुन जात असताना सकलप फाटा येथे झालेल्या अपघातात चालकाचा मृत्यु झाला

सकलप फाटा म्हसळा ते श्रीवर्धन जाणा–या रोडवर डंपर सकलप फाटा येथे आला असता चालकाने डंपर भरधाव वेगात ,हयगयीने, निष्काळजीपणाने, रस्त्याचे परीस्थीतीकडे दुर्लक्ष करुन चालवीत येउन रस्त्याचे बाजुला असलेल्या दरडीला ठोकर मारुन अपघात झाला

यात चालकाच्या डोक्यास,हाताला,पोटाला गंभीर स्वरुपाच्या दुखापती होवुन तो स्वत:चे मरणास व डंपरच्या नुकसानीस कारणीभुत झाला. याबाबत म्हसळा पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोना/पालोदे हे करीत आहेत.


**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**अलिबाग सा.बां. विभाग, अलिबाग पिन कोड – ४०२ २०१**

ई–मेल पत्ता :– alibag.ee@mahapwd.com दुरध्वनी/फॅक्स क्रमांक :– (०२१४१)२२२०८४/२२५०९६

**ई–निविदा सूचना क्र. ५१ सन २०२४–२०२५**

कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून सक्षम कंत्राटदारांकडून नोंदणीकृत कंत्राटदारांकडून ब–१ नमुन्यातील ई–निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत रुपये |
|---|---|---|
| १ | रुपराई ते झापडी रस्त्याची सुधारणा करणे कि.मी. ०/०० ते १/३५० ता. पेण जि.रायगड | १,६३,५४,३०४/– |
| २ | दाबाचीवाडी ते ताडवाडी रस्त्याचे बांधकाम करणे ता. पेण जि. रायगड | १,२४,५१,८८८/– |
| ३ | करोटी कातकरवाडी रस्त्याची सुधारणा व संरक्षक भिंत बांधणे ता. पेण जि. रागयड | १,२०,७०,०८९/– |
| ४ | बांधणी बंगलावाडी रस्त्याला संरक्षक भिंत बांधणे ता. पेण जि. रागयड | १,२६,३२,८३९/– |
| ५ | निधवलीवाडी ते कावजीवाडी रस्ता करणे ता. पेण जि. रायगड | १,२५,८६,६७०/– |
| ६ | झापडी ते सोनगिरी ते रुपराई रस्त्याचे बांधकाम करणे कि.मी. १/३५० ते १/६०० ता. पेण जि. रायगड | १,२३,२३,६८६/– |
| ७ | सोनगिरी ते झापडी रस्ता तयार करणे व संरक्षण भिंत बांधणे ता. पेण जि. रायगड | १,१३,६०,१०१/– |
| ८ | गणीचीवाडी ते मानटवाडी रस्ता करणे ता. पेण जि. रायगड | १,१८,८१,१०९/– |
| ९ | भोगोंली येथे रस्त्याची सुधारणा व संरक्षण भिंत बांधणे ता. पेण जि. रायगड | १,१९,७४,७२३/– |

**ई–निविदा उपलब्ध कालावधी** : दिनांक २६.०३.२०२५ (स.१०.०० ) ते दिनांक २.०४.२०२५ (सं.१८.००)
**निविदापूर्व बैठक** : अ.क्र.१ मा. अधीक्षक अभियंता, रायगड (सा.बां.) मंडळ,कोकणभवन, नवी मुंबई यांचे दालनात दि. २७.०३.२०२५ रोजी स. १५.०० वाजता.
**ई–निविदा उघडणे** : दिनांक ४.०४.२०२५ (दु. ३.०० वा.) (अधीक्षक अभियंता, रायगड (सा.बां.) मंडळ, कोकणभवन, नवी मुंबई)

खालील संकेतस्थळावर ई– निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. http://mahapwd.com
२. http://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल. )
३. कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग कार्यालयातील सूचना फलक.

जा.क्र./ सा.बां./अवि/निविदा/ ११४५/२०२५
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां. विभाग, अलिबाग – ४०२ २०१
दिनांक :– १७/०३/२०२५

सही/–
कार्यकारी अभियंता,
सा. बां. विभाग, अलिबाग, जि.रायगड



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे भिंगार, ता. पनवेल, जि. रायगड येथील **हिराबाई कृष्णा पाटील** यांचे नावे असलेली, ताबेकब्जातील तसेच मालकी हक्काची, खुद्द स्वरूपाची खालील वर्णनाची शेतजमिन आमचे आशिलांनी खरेदीखताने विकत घेण्याचा विचार आहे.

परीशिष्ट
**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे भिंगार, तालुका–पनवेल, जिल्हा–रायगड.**

| कब्जेदारांचे नाव | गट नं./ सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| हिराबाई कृष्णा पाटील | १४९ | १ | ०–७३–६० पो.ख. ०–००–८० ०–७४–४० **दुसरेपक्षी यांच्या हिश्याचे महसूल अभिलेखात दाखल असलेले क्षेत्र ०–१८–६० हे.आर.चौ.मी.** | १.६६ |

सबब वर नमुद परीशिष्ट शेतजमीन मिळकतीवर, वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारच्या हक्क, हितसंबध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, ॲटचमेंट, लीज एम.ओ.यु. वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून **२१ दिवसाच्या** आत हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमुद मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्यासोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल, याची तमाम लोकांनी / नागरिकांनी कृपया नोंद घ्यावी.

दिनांक : २५/०३/२०२५

सही /–
**विजय भगत ॲन्ड असोशिएटस्**
(ॲडव्होकेट ॲन्ड लिगल कन्सलटंट)

शॉप नं. १२८, पहिला मजला, नगरपालीका शॉपिंग कॉम्प्लेक्स, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड. मो.९३२२६५२३१९/९८२०६०७५७२
Email.vijaybhagat43@gmail.com



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे तळोजे मजकूर, तहसील– पनवेल, जिल्हा – रायगड येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार श्री. गजानन धर्मा पाटील यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे :–

**शेतजमीनीचे वर्णन**

मौजे तळोजे मजकूर, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील जिल्हा परीषद रायगड, पंचायत समिती पनवेल, मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील.

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र: लावणी लायक हे.आर.प्रती | क्षेत्र: पोटखराबा हे.आर.प्रती | क्षेत्र: एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १२४/१/१/क/२ | १ | ०–२०–०० | ०–००–०० | ०–२०–०० | २.१० |

वरील शेतजमीन/मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोष्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २४/०३/२०२५

सही/–
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए, एल.एल.बी.
(खरेदीदाराचे बकिल)

**कार्यालयीन पत्ता :** बी. १०२, पहिला मजला, श्री दत्तराज सोसायटी, जुने तहसिलदार ऑफिससमोर ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६

# कुणाल कामरावर गुन्हा दाखल करा

## नवी मुंबई शिवसेनेचे पोलिसांना पत्र

**नवी मुंबई : बातमीदार**

तथाकथित स्टँडअप कॉमेडीयन कुणाल कामरा याने शिवसेना मुख्य नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याविषयी विडंबनात्मक काव्य केल्याने शिवसेना आक्रमक झाली आहे. मुंबईतील खार येथे कुणाल कामराचा शो असलेल्या क्लबची तोडफोड करण्यात आली.

संपूर्ण महाराष्ट्रात शिवसैनिक कामरा विरोधात आक्रमक झाले आहेत. अशात नवी मुंबईतील शिवसेना देखील आक्रमक झाली असून, शिवसेना उपनेते विजय चौगुले यांनी रबाळे पोलिस ठाण्यात कुणाल कामरावर गुन्हा दाखल करण्याबाबत तक्रार अर्ज दाखल केला.यावेळी ऐरोली जिल्हाप्रमुख द्वारकानाथ भोईर, मनोज हळदणकर,



विजयानंद माने, अनिकेत म्हात्रे, सुरेश सकपाळ, गणेश म्हात्रे, एड. रेवेंद्र पाटील तसेच शिवसैनिक उपस्थित होते.

कुणाल कामराने केलेले अश्लाघ्य वक्तव्य अतिशय निंदनीय आहे. राज्याच्या उपमुख्यमंत्री पदी असणाऱ्या व्यक्तीबद्दल मर्यादा ओलांडून हीन दर्जाची पातळी गाठणाऱ्या कुणाल कामराचा आम्ही तीव्र शब्दांत निषेध व्यक्त करतो असे चौगुले यांनी म्हटले आहे. एकनाथ शिंदे हे महाराष्ट्राच्या जनतेने निवडून दिलेले लोकप्रिय उपमुख्यमंत्री आहेत. राज्याच्या विकासासाठी आणि जनतेच्या हितासाठी सतत कार्यरत राहण्याचा वसा घेतला आहे.

अशा नेत्याविषयी जाहीरपणे विनोदाच्या नावावर अश्लाघ्य भाषेत कविता प्रसारित करणे हे सुसंस्कृत महाराष्ट्राला शोभणारे नाही. शिंदे यांच्यावर केलेली कविता ही समस्त शिवसैनिकांचा अपमान आहे. लोकशाहीमध्ये अभिव्यक्तिस्वातंत्र्याच्या नावाखाली मर्यादा ओलांडून व्यक्तव्य करणारे कोणत्याही परिस्थितीत स्वीकारार्ह नाही, अशा बेजबाबदार व्यक्तींवर कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. त्यामुळे कुणाल कामरावर गुन्हा दाखला करावा अशी मागणी चौगुले यांनी केली.

# स्व. अण्णासाहेब पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त सभा संपन्न

**नवी मुंबई : बातमीदार**



महाराष्ट्र राज्य माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियनच्या वतीने माथाडी कामगारांचे आराध्य दैवत कै. आमदार अण्णासाहेब पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त माथाडी भवन, नवी मुंबई येथील सभागृहात आयोजित केलेल्या सभेमध्ये माथाडी कामगार नेते माजी आमदार नरेंद्र अण्णासाहेब पाटील यांनी, आपल्यावर सर्वांची नजर आहे. वाईट प्रवृत्ती सातत्याने जलदगतीने डोके वर काढत आहेत आणि यासारख्यांना साथ देणारे व माथाडी चळवळ संपविणारे आपल्यातलेच आहेत असेही त्यांनी वक्तव्य केले.

आता आपल्याला आत्मचिंतनाची गरज असून, माथाडी चळवळीमध्ये आपण कोठे कमी पडतोय याचाही वेध घेतला पाहिजे. घुसखोर माथाडी कामगारांनी खंडणी वसुलीच्या नावाखाली माथाडी चळवळीत आपले साम्राज्य निर्माण केले आहे ते नेस्तनाभूत करण्याचं जबरदस्त आव्हान आपल्या सर्वांसमोर आहे. मी गुंडाशी कधीही हातमिळवणी केली नाही आणि करणारही नाही असे निर्भिडपणे त्यांनी सांगितले.

या सभेमध्ये बोलताना माजी खासदार संजीव नाईक असे म्हणाले की, अण्णासाहेब पाटील यांच्या कार्यामुळेच माथाडी चळवळीमध्ये नवनवीन नेतृत्व निर्माण झाले. हेच नेतृत्व आज खऱ्या अर्थाने माथाडी चळवळ तिचे अस्तित्व टिकवूण ठेवण्याचे काम जोमाने करीत आहे. राजकिय स्पष्टता, वैचारिक स्पष्टता नसली तरीही याच नेतृत्वाने माथाडी कामगारांच्या चळवळीसाठी एकोप्याची भुमिका घेवून माथाडी चळवळीला अबाधित ठेवले आहे. आपली एकी हिच अण्णासाहेबांना आजच्या दिवशी सन्मानाची श्रध्दाजंली आहे आणि ही एकी अशीच टिकून रहावी अशी अपेक्षा संजीव नाईक यांनी व्यक्त केली ते पुढे असेही म्हणाले की, एकत्र राहण्याची भावना आपल्या सर्वांमध्ये सातत्याने जागृत राहिली पाहीजे. यासाठी आपल्या चळवळीसमोर भविष्यात निर्माण होणाऱ्या कोणत्याही समस्यांचे निवारण करण्यासाठी गणेश नाईक यांच्या नेतृत्वाखाली आमचे नाईक परिवार आपल्या चळवळीच्या नेहमीच पाठिशी राहील अशी ग्वाही त्यांनी दिली.

या सभेत आपल्या भाषणात माथाडी संघटनेचे कार्याध्यक्ष आमदार व माजी मंत्री शशिकांत शिंदे असे म्हणाले की, ज्या समाजासाठी अण्णासाहेबांनी अथक प्रयत्न करुन मराठा चळवळ उभी केली आणि त्यासाठी बलिदान दिले. हे अण्णासाहेबांच्या कार्यकिर्दितील महत्वाचा भाग आहे. अण्णासाहेब दोन चळवळी चालवत होते एक माथाडी चळवळ आणि दुसरी मराठा चळवळ माथाडी कामगार चळवळीच्या माध्यमातून त्यांनी ऐतिहासीक माथाडी कामगार कायदा व इतर सुविधा माथाडी कामगारांना मिळवून दिल्या. गेल्या पाच वर्षांच्या व त्याच्या आधीच्याही सरकारने माथाडी चळवळीच्या विरोधात निर्णय घेण्याचे प्रयत्न केले. आजही माथाडी कामगार कायद्यात बदल करण्यासाठी कांही अदृष्य शक्ती कार्यरत आहेत. पण आम्ही माथाडींच्या हिताला धक्का लागेल किंवा त्यांच्यावर अन्याय होईल असे कोणतेही बदल आम्ही सरकारला करु देणार नाही.

माथाडी कामगार कायदा विधेयकाबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी या विधेयकाच्या चर्चेनिमित्त सभागृहात माथाडी कामगारांच्या हिताबाबत स्पष्ट भुमिका मांडल्याबाबत त्यांचेही शशिकांत शिंदे यांनी आभार मानले.

या वेळी माथाडी कामगार संघटनेचे कार्याध्यक्ष गुलाबराव जगताप, माजी आमदार विजय सावंत, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक श्रीधर डुबे-पाटील, उपमहाव्यवस्थापक आकाश मोरे, प्राना फाऊंडेशनच्या अध्यक्ष डॉ. प्राची नरेंद्र पाटील, ग्रोमा असोसिएशनचे अध्यक्ष मुयर सोनी, संघटनेचे अध्यक्ष एकनाथ जाधव, संयुक्त सरचिटणीस चंद्रकांत पाटील, रविकांत पाटील, दिलीप खोंड, संघटनेचे सचिव आमदार मनोज जामसुतकर पतपेढीचे व्यवस्थापकीय संचालक रमेश अण्णासाहेब पाटील, माथाडी हॉस्पीटलचे मुख्य वैद्यकिय अधिकारी हणमंतराव पाटील, संघटनेचे उपाध्यक्ष सुर्यकांत पाटील, संघटनेच्या कायदेशीर सल्लागार अॅड. भारती पाटील उपस्थित होते.

# सिडकोच्या सागरी महामार्गावरील नारळी वृक्ष वाढत्या उष्म्यामुळे संकटात



**उरण : रामप्रहर वृत्त**

द्रोणागिरी नोड आणि उरणला जोडणाऱ्या सिडकोच्या सागरी महामार्गावरील अनेक नारळी वृक्ष वाढत्या उष्म्यामुळे संकटात आले आहेत. अनेक वृक्ष उन्हामुळे करपू लागले आहेत. सिडकोने जेएनपीटी ते पळस्पे या राष्ट्रीय महामार्गाला जोडणारा चार पदरी सागरी महामार्ग तयार केला आहे. या नारळांच्या वाढत्या झाडांमुळे हा सागरी मार्ग सिडकोला उत्पन्न देणारा आणि त्याच बरोबर महामार्गाची वेगळी ओळख निर्माण करणारा ठरणार आहे.

समुद्र आणि खाडी लगत असलेल्या या परिसरात नारळाच्या वृक्षांची वाढ होण्यासारखे पोषक वातावरण आहे. द्रोणागिरी ते पागोटे या पाच किलोमीटर लांबीच्या सागरी महामार्गावर सिडकोने प्रचंड खर्च करून पहिल्यांदाच अडीच हजारांपेक्षा अधिक नारळी वृक्षांचे रोपण करण्यात आले आहे. मात्र या वृक्षांची देखभाल होत नसल्याने हा खर्च वाया जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

एकीकडे या वृक्षांच्या देखभाली साठी सिडकोच्या द्रोणागिरी नोड विभागाकडून खर्च केला जात आहे. मात्र त्याचा फायदा होतांना दिसत नाही. त्यामुळे येथील नागरिकांनीही नाराजी व्यक्त केली आहे. या मार्गावर मोठया प्रमाणात नागरिक सकाळी व सायंकाळी वॉक करण्यासाठी येतात.

या महामार्गाच्या दोन्ही मार्गिकावर ही वृक्ष लागवड करण्यात आली आहे. मात्र गवताला लावण्यात येणाऱ्या आगीमुळे तसेच वेळेत पाणी न मिळाल्याने ही वृक्ष नष्ट होत आहेत. त्यामुळे या वृक्षांची निगा राखून काळजी घेणे आवश्यक आहे. सिडकोने या मार्गाच्या सौंदर्यात भर टाकणाऱ्या नारळी वृक्षांची जपणूक करण्यात यावी अशी मागणी पर्यावरणवादी कार्यकर्ते निकेतन ठाकूर यांनी केली आहे.

# माहितीचा अधिकार कार्यकर्ता महिलेवर खंडणीप्रकरणी गुन्हा दाखल

**नवी मुंबई : बातमीदार**

महापे एमआयडीसीतील कोल्डस्टोरेजचे बांधकाम नियमबाह्य असल्याचा आरोप करून ४० लाखांची खंडणी मागणाऱ्या माहिती अधिकार कार्यकर्ता महिलेवर गुन्हा दाखल केला आहे. या महिलेने व्यापाऱ्याला गाडीत बसवून लिफाफ्यावर लिहून पैशांची मागणी केली होती. यामुळे गुन्ह्यात वापरलेली गाडीही जप्त करणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

नवी मुंबईत अनधिकृत बांधकामे तेजीत असताना, दुसरीकडे या अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांना ब्लॅकमेल करत खंडणीचे प्रकार घडत असल्याचे सातत्याने समोर येत आहे. त्यानुसार रबाळे पाठोपाठ तुर्भे एमआयडीसी पोलिस ठाण्यात महिलेवर ४० लाखांच्या खंडणीचा गुन्हा दाखल झाला आहे.

महापे एमआयडीसीत एका कोल्डस्टोरेजचे काम सुरू आहे. त्याठिकाणी नियमबाह्य काम झाल्याचे सांगत, त्याविरोधात या तथाकथित माहिती अधिकार कार्यकर्त्या शीतल वाघमारे या महिलेने एमआयडीसीकडे तक्रार केली होती. या तक्रारीच्या आड व्यापाऱ्याला भेटण्यास तिने बोलावले होते. त्यानंतर व्यापाराला स्वतः च्या कारमध्ये बसवून कागदी लिफाफ्यावर ४० लाखांचा आकडा लिहून खंडणी मागण्यात आली.

अखेर व्यापाऱ्याने याबाबत पोलिसांकडे तक्रार केली. त्यावरून तुर्भे एमआयडीसी पोलिसांनी चौकशीसाठी बोलावले असता, त्यांनाही शीतल यांनी दमदाटीची भाषा वापरली. अखेर व्यापाऱ्याच्या तक्रारीवरून माहिती अधिकार कार्यकर्ता शीतल वाघमारे हिच्याविरोधात खंडणीचा गुन्हा दाखल केला आहे.

# 'गरीबांचा फ्रीज' बाजारात दाखल

## कडक उन्हाळ्यात माठांची मागणी वाढली



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

उन्हाची चाहूल लागताच अनेकांचे पाय गरीबांचा फ्रीज म्हणून ओळखला जाणारा माठ यांच्याकडे वळत असल्याचे दृश्य सध्या अनेक ठिकाणी पहावयास मिळत आहे.

माठाचे पाणी आरोग्यासाठी लाभदायक असून या पासून अनेक फायदे होत असतात.यामुळे अनेकजण उन्हाळ्यामध्ये माठ खरेदी करीत असतांना पहावयास मिळत आहे. होळीच्या नंतर उन्हाची दाहकता वाढत असते.यामुळे या माठाचे महत्व आजही आबाधित आहे.

दरवर्षी उन्हाळ्यात सर्वसामान्यांची तहान भागविण्यासाठी पाणपोई म्हणून या माठाचा हॉटेल, तसेच विविध ठीकाणी वापर केला जात असल्यामुळे तालुक्याच्या ठीकाणी उन्हाळ्याच्या झळा चांगल्याच जाणवू लागल्या आहे. फेब्रुवारी महिन्यात च्या सुरुवातीस उन्हाच्या झळा सौम्य स्वरुपाच्या होत्या मात्र होळीच्या नंतर उन्हाचा दाह वाढू लागणार आहे. यामुळे येणारा उन्हाळा तीव्र स्वरूपाचा होणार असल्याचे तर्क नागारिक यांच्या कडून वर्तवले जात आहे. उन्हाळ्यांची चाहूल लागताच आपली तृष्णा शांत करण्यासाठी अनेक जन थंड पेय यांच्याकडे आकर्षित होत असतात.

फ्रिजचे पाणी अनेकांना त्रास दायक असल्यांने प्रत्येक नागरीक माठ खरेदि करीत असतो. यामुळे कुंभार समाजाला रोजगार मिळत असतो. माठाला दरवर्षी उन्हाळ्यात मागणी वाढत असते. तरी सुद्धा श्रीमंत वर्गालाही या माठाचे आकर्षण आहे. माठातील थंडगार पाणी आणि चवीमध्ये माधुर्य असते. यामुळे माठाला गरीबांचा फ्रीज म्हटले असे संबोधले जाते.

# नवी मुंबईत १३००पैकी अवघे ४१० सीसीटीव्ही कॅमेरे सुरू

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई शहरात तत्कालिन आयुक्त अभिजीत बांगर यांच्या कार्यकाळात १५२ कोटी रुपये खर्चातून शहरात १५२४ सीसीटीव्हींची नजर शहरावर राहणार होती परंतु १५०० पैकी १३०० कॅमेरे लागले असून त्यातील फक्त ४१० सीसीटीव्हीच कार्यरत आहेत.

नवी मुंबई महानगरपालिकेने शहरात १५२४ हाय डेफिनेशन कॅमेरे, स्पीड डिटेक्शन कॅमेरे, ट्रॅफिक कॅमेरे, आणि एव्हिडन्स कॅमेरे बसवण्याची निविदा २०२२ मध्ये मे. टाटा डव्हान्स सिस्टीमला दिली होती. परंतु अद्याप अंमलबजावणीच्या पातळीवर टाटासारख्या विश्वासार्ह कंपनीला देखील तब्बल ३ वर्षानंतर प्रकल्प पूर्णत्वास नेण्यात यश आले नाही. सध्या शहरात १३०० सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून त्यातील केवळ ४१० कॅमेरे प्रत्यक्षात कार्यरत असल्याचे दिसून आले आहे.

पालिका मुख्यालयात सीसीटीव्ही नियंत्रणाचा मोठा कक्ष आहे. परंतू पोलीस प्रशासन व पालिका प्रशासन यांच्यात



समन्वयाचा अभाव असल्याने वर्तमानात पोलीस यंत्रणेकडे केवळ चार संगणक असून त्याद्वारे सीसीटीव्ही तपासणी केली जाते. पालिका मुख्यालयात सुसज्ज अशी सीसीटीव्ही मॉनिटरिंग यंत्रणा असल्याने सीसीटीव्ही ज्या उद्दिष्टपूर्तीसाठी बसवलेले आहेत त्यादृष्टीने पोलीस व पालिकेने संयुक्त मॉनिटरिंग व्यवस्था करणे नितांत गरजेचे असल्याचे मत सामाजिक कार्यकर्ते संजय सोनावणे यांनी व्यक्त केले. याबाबत मे.टाटा डव्हान्स सिस्टीम कंपनीच्या पदाधिकाऱ्यांना संपर्क केला असता संपर्क झाला नाही.

संबंधित ठेकेदाराने ९५ टक्के पेक्षा अधिक कॅमेरे लावलेले आहेत. परंतु अद्याप १०० टक्के काम पूर्ण न झाल्यामुळे देखभाल दुरुस्तीचे काम पालिकेने दिलेले नाही. पालिका प्रशासनाने ठेकेदाराला १५ दिवसाचा अंतिम अल्टीमेटम दिलेला आहे.

**–शिरीष आदरवाड,**
शहर अभियंता ,नवी मुंबई महापालिका

नवी मुंबई करदात्या नागरिकांच्या दृष्टीने सीसीटीव्हीचे अनन्यसाधारण महत्व आहे. सीसीटीव्ही प्रोजेक्ट १०० टक्के कार्यान्वित असणे गरेजेचे आहे. अनेक वर्षात हा प्रकल्प पूर्ण होत नाही हे दुर्दैव आहे. पालिका आयुक्तांची भेट घेऊन याबाबत निवेदन देऊन पाठपुरावा करू.

**–अरुण कागले,** सदस्य,
सजग नागरिक मंच, नवी मुंबई

# महिला बेपत्ता

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राहत्या घरातून ४० वर्षीय महिला कुणालाही काहीही न सांगता निघून गेली आहे. जयमाला रवी कांबळे असे तिचे नाव असून ती मनोरुग्ण आहे. रविवारी सायंकाळी साडेसाच्या सुमारास राजापाडा, तळोजा येथून ती निघून गेली आहे.



उंची ४ फुट २ इंच, रंग सावळा, बांधा मध्यम, चेहरा उभट, टोकदार नाक, अंगात राखाडी रंगाची साडी नेसली असून तिला मराठी भाषा बोलता येते. या वर्णनाची महिलेबाबत काही माहिती मिळाल्यास ८६५५३५४११७ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन तळोजा पोलिसांनी केले आहे.

# मालेट बंदर येथे कॉर्पोरेट कार्यालय उभारण्याची जनेप प्राधिकरणाची घोषणा

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाने २५ मार्च २०२५ रोजी मुंबई बंदर क्षेत्रातील मालेट बंदर येथे कॉर्पोरेट कार्यालयीन इमारतीचा विकास करण्याची घोषणा करण्यात आली. जनेप प्राधिकरणाचे अध्यक्ष आणि वाढवण बंदर प्रकल्पाचे अध्यक्ष तथा महासंचालक उन्मेष वाघ यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना ही घोषणा केली.

या कॉर्पोरेट कार्यालय इमारतीच्या विकासासाठी जनेप प्राधिकरणाला बंदरे, जहाज वाहतूक आणि जलमार्ग मंत्रालयाकडून तत्वतः मंजुरी मिळाली आहे.जनेप प्राधिकरणाने प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत ७ दशलक्ष टीईयूएसच्या विक्रमी हाताळणीचा आनंद केक कापून साजरा केला. १७ मार्च २०२५ रोजी जनेप प्राधिकरणाने ही महत्त्वाची कामगिरी केली. हे जनेप प्राधिकरणाचे उत्कृष्ट परिचालन प्रयासांचे आणि त्याच्या टर्मिनल ऑपरेटरांच्या मेहनतीचे प्रतिक आहे.

यावर्षी आम्ही प्रथमच ७ दशलक्ष टीईयूएसचा टप्पा ओलांडला. हे आमच्या वृद्धीचे आणि प्रगतीचे प्रतिबिंब आहे. आमचे टर्मिनल ऑपरेटर उत्कृष्ट काम करत आहेत आणि बंदर परिसंस्थेतील सहकार्यात्मक प्रयत्नांचे या यशात योगदान आहे. चौथ्या कंटेनर टर्मिनलच्या दुसऱ्या टप्प्याच्या कार्यान्वयनासह लवकरच जनेप प्राधिकरण एक कोटीहून अधिक टीईयूएसची कंटेनर हाताळणी क्षमता असलेले भारताचे पहिले बंदर बनेल असे वाढवण प्रकल्पाचे अध्यक्ष उन्मेष वाघ यांनी म्हटले असून,वाढत्या व्यापार मागणीला तोंड देण्यासाठी आम्ही आमच्या पायाभूत सुविधांचा विकास करत आहोत. उत्कृष्टतेसाठीचा जनेप प्राधिकरणाचा दृष्टीकोन बंदरांच्या कामकाजाच्या पलीकडे जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधांच्या निर्मितीपर्यंत असा विस्तारित आहे. मुंबई बंदर क्षेत्रातील मालेट बंदर येथील आमच्या कॉर्पोरेट कार्यालयाच्या उभारणीचा निर्णय ही आमची कार्यक्षमता



आणि अखंड समन्वयाप्रती आमची बांधिलकी प्रतिबिंबित करतो, असेही त्यांनी म्हटले.

जनेप प्राधिकरण २०पेक्षा जास्त मजल्यांची प्रतिष्ठित उंच इमारत विकसित करण्याची योजना आखत आहे. प्रस्तावित कॉर्पोरेट कार्यालयाची जागा फेरी व्हार्फ आणि डोमेस्टिक क्रूझला लागून असलेल्या मालेट बंदर रोडवर आहे. मुंबई बंदर प्राधिकरणाने (एमबीपीए) जनेप प्राधिकरणाला १२,८०४ चौरस मीटर (३.१६ एकर) भूखंड लीजवर देण्याचे मान्य केले आहे. देशातील कंटेनर हाताळणी बंदर असलेल्या जनेप प्राधीकरणाचे कॉर्पोरेट कार्यालय प्रस्तावित इमारत्तीत असणार आहे. वाढवण बंदर प्रकल्प लिमिटेड (व्हीपीपीएल), भारतातील पहिले महा-बंदर विकसित करत असल्याने यासाठी देखील मुंबईत कॉर्पोरेट कार्यालयाची आवश्यकता आहेच. शिवाय या इमारतीत नौवहन महासंचालक, इंडिया पोर्ट्स ग्लोबल लिमिटेड (आईपीजीएल) आणि इंडियन पोर्ट रेल ॅड रोपवे कॉर्पोरेशन लिमिटेड (आईपीआरसीएल) सारख्या बंदर संलग्न संस्थांची कार्यालयेही असतील.

या इमारतीच्या सर्वात वरच्या मजल्यावर डिजिटल वेधशाळा असेल आणि तळमजल्यावर २००० आसन क्षमतेचे सुविधांसह अत्याधुनिक सभागृह असेल. इतर मजल्यांवर जनेप प्राधिकरण, वाढवण बंदर प्रकल्प लिमिटेड आणि केंद्र आणि राज्य सरकारची कॉर्पोरेट कार्यालये असतील. उचित वाटल्यास ही जागा विकसित करण्यासाठी सार्वजनिक-खासगी भागीदारी तत्वावर देखील दिली जाऊ शकते. ही इमारत पूर्णपणे सर्वोच्च दर्जाची हरित इमारत म्हणून विकसित केली जाईल.जमीन, इमारत, इंटीरियर आणि आवश्यक सुविधांसह या प्रकल्पाचा एकूण खर्च सुमारे १००० कोटी रुपये असेल. या इमारतीची रचना ४.० एफएसआयसह केली जाणार आहे. तसेच बांधकाम क्षेत्र सुमारे ९ लाख चौरस फूट असेल. जनेप प्राधिकरणाने तपशीलवार रचना, अभियांत्रिकी, बांधकाम आणि प्रकल्प व्यवस्थापन सेवांसह प्रकल्प उभारणीच्या संपूर्ण सल्लामसलतीसाठी इंजिनिअर्स इंडिया लिमिटेड (ईआयएल)ची नियुक्ती केली आहे. आवश्यक मंजुरी आणि परवानगी मिळाल्यानंतर दोन वर्षांत इमारत पूर्ण करण्याचे जनेप प्राधिकरणाचे लक्ष आहे.

जनेप प्राधिकरणाने राज्य सरकारला जागा देऊ केली आणि प्रारंभिक चर्चेदरम्यान राज्य सरकारने यात स्वारस्य दाखवले. लवकरच याबाबत अधिकृत पत्र देण्यात येणार आहे. जनेप प्राधिकरणाने वाढवण बंदर प्रकल्पासारख्या आगामी प्रकल्पांसह कार्यक्षमता वाढवण्यावर आणि व्यापार सुलभ करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. अलीकडेच जनेप प्राधिकरणाच्या वाढवण बंदर कौशल्य कार्यक्रमाच्या उपक्रमाचा एक भाग म्हणून, सीमाशुल्क दस्तऐवजीकरण अभ्यासक्रमासाठी एक अभिमुखता कार्यक्रम पालघर येथे आयोजित करण्यात आला होता. सीमाशुल्क प्रक्रिया आणि लॉजिस्टिक्स क्षेत्रात आपले ज्ञान वाढवण्यासाठी उत्सुक असलेल्या विद्यार्थ्यांचा उत्साहपूर्ण सहभाग या कार्यक्रमात दिसून आला. या संदर्भातील व्हॉट्सअप चॅटबॉटद्वारे आतापर्यंत जनेप प्राधिकरणाला २१ हजारहून अधिक नोंदणी प्राप्त झाल्या आहेत.

# शाळांना संगणक, प्रोजेक्टरचे वाटप

## श्रीवर्धन तालुक्यात भाजपचा स्तुत्य उपक्रम

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाच्या श्रीवर्धन तालुका शाखेच्या वतीने आमदार निरंजन डावखरे यांच्या माध्यमातून विविध शाळांना संगणक आणि प्रोजेक्टर साहित्य वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाचे आयोजन भाजपचे महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण, जिल्हा अध्यक्ष खासदार धैर्यशील पाटील, श्रीवर्धन विधानसभा अध्यक्ष प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनात तालुका अध्यक्ष आशुतोष पाटील यांच्या नेतृत्वाखाली झाले.

या उपक्रमामुळे आदगाव, नानवली, दिघी, कुडगाव, वडवली, कापोली, दिवेआगर येथील शाळांच्या शिक्षक व विद्यार्थ्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाची महत्त्वाची साधने प्राप्त झाली.



कार्यक्रमास भाजप तालुका अध्यक्ष माजी अध्यक्ष जयदीप तांबूटकर, सरचिटणीस मुकेश गोरीवले, चिटणीस उमेश अडखळे, कोषाध्यक्ष तुषार विचारे, युवा मोर्चा अध्यक्ष प्रणय पेडणेकर, सूरज मांजरेकर आदी पदाधिकारी, कार्यकर्ते, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यकमाच्या माध्यमातून भाजपच्या वतीने श्रीवर्धन तालुक्यातील विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणासाठी आवश्यक साधने उपलब्ध करून देण्याचे एक महत्त्वाचे पाऊल टाकण्यात आले आहे. शालेय विद्यार्थ्यांना डिजिटल साधनांचा वापर शिकवण्याची ही एक उत्तम संधी असून तालुक्यातील शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी हा कार्यक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

# पाली शहरात सार्वजनिक सुलभ शौचालयांची कमतरता

## नागरिकांची गैरसोय दूर करण्याची मागणी

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

पाली हे शहर अष्टविनायकांपैकी एक तीर्थक्षेत्र असून सुधागड तालुक्याचे मुख्य ठिकाण आहे. अंदाजे १० ते १२ हजार लोकसंख्या असलेल्या या शहरात शासकीय कामे, खरेदी आणि विक्रीसाठी तसेच धार्मिक कारणांसाठी दररोज मोठ्या प्रमाणात लोकांची वर्दळ असते, मात्र सार्वजनिक सुलभ शौचालयांची मोठी कमतरता असल्याने खेड्यापाड्यातून येणाऱ्या नागरिकांसह भाविकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे.



पाली शहरातील प्रमुख शौचालये ही पाली गणपती देवस्थान आणि तहसीलदार कार्यालयाच्या परिसरात आहेत, मात्र ही शौचालये शहराच्या बाजारपेठेपासून दूर असल्याने व्यापारी, ग्राहक, महिला आणि प्रवाशांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते.

पाली हे बल्लाळेश्वराचे तीर्थक्षेत्र असून येथे वर्षभर भाविक येत असतात. याशिवाय पाली शहर ही सुधागड तालुक्यातील प्रमुख बाजारपेठ असल्याने गणपती, दिवाळी, होळी, ईद आणि लग्नसराई यांसारख्या सण-उत्सवांच्या काळातही मोठ्या प्रमाणात लोक खरेदीसाठी शहरात येतात, पण शौचालयांच्या अभावामुळे महिलावर्गाला अधिक त्रास सहन करावा लागत आहे.

पालीतील ही गंभीर समस्या लक्षात घेऊन स्थानिक नागरिकांकडून नगरपंचायतीकडे मध्यवर्ती ठिकाणी सुलभ शौचालय बांधण्याची मागणी होत आहे. ही समस्या लवकरात लवकर सोडविण्याचीही अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

# जलसंधारण जनजागृतीसाठी वॉटर शेड यात्रा

## पर्यावरणाचा समतोल साधा -मनीष नांदगावकर

**मुरूड : प्रतिनिधी**

केंद्रीय भूसंपादन विभाग, ग्रामीण विकास मंत्रालयाच्या मार्फत प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० या अंतर्गत राज्यात वॉटरशेड यात्रा काढण्यात आली आहे. या रथाचे पूजन व अन्य कार्यक्रमाचे आयोजन राज्य शासनाच्या मृद व जलसंधारण विभागाच्या वतीने उसरोली येथे करण्यात आले होते.

या वेळी आगरी समाज सभागृहात आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना माजी सरपंच मनीष नांदगावकर म्हणाले की, पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी झाडे लावून त्याचे संगोपन करा. नदीतील पाणी अडवून ते जिरवल्याने विहिरींना शेतीला पाझर व झरे निर्माण होतात. म्हणून शेतकऱ्यांनी पाणी अडवून ते जमिनीत जिरवणे महत्त्वाचे आहे. वृक्ष तोड थांबवावी. पर्यावरणाचा समतोल राखण्याचा असेल तर जास्तीत जास्त नागरिकांनी वृक्ष लागवड मोठ्या प्रमाणात करावी.

शेततळे व फळबाग लागवड १०० टक्के अनुदानाची शासनाची योजना आहे. तिचा फायदा शेतकऱ्यांनी घेतला पाहिजे. सुशिक्षित बेरोजगार तरुणांनी आधुनिक शेती करणे आवश्यक आहे. त्यातून त्यांना रोजगार मिळून ते स्वावलंबी होतील. निसर्ग आपल्याला सर्व काही देतो निसर्गावर प्रेम करा, त्याचे जतन व संवर्धन करा; अन्यथा आपणच आपल्या विनाशाला कारणीभूत ठरू याची जाणीव प्रत्येकाने ठेवणे गरजेचे आहे, असेही त्यांनी सांगितले.




मुरुड तालुक्यातील नांदगाव, उसरोली, मजगाव, वेळास्ते व काशीद या पाच ग्रामपंचायती अंतर्गत १६ गावे निवडण्यात आली आहेत. यातील वनक्षेत्र हद्दीत वनविभागाने वनराई बंधारे, गॅबियन बंधारे, वनतलाव, वृक्षलागवड तर वनेतर क्षेत्र हद्दीमध्ये कृषी विभागाच्या कामात फळबाग लागवड, शेततळे, भातशेती दुरुस्ती, सलग समतल चर व जलसंधारण विभागाने गॅबियन बंधारे, सिमेंट नाला बंधारा अशा प्रकारची कामे करता येतात. यात लोकसहभाग महत्त्वाचा असून शेतकऱ्यांचे सहकार्य हवे आहे, असे प्रास्ताविकात उपविभागीय जलसंधारण अधिकारी महेंद्र बावणे यांनी नमूद केले.

सरपंच सेजल घुमकर, मंडळ कृषी अधिकारी नरडे यांचीही भाषणे झाली. कार्यक्रमासाठी असंख्य ग्रामस्थ उपस्थित होते.

# माणगावमध्ये वेध भविष्याचा आणि शिक्षणातील संधी कार्यक्रम

**माणगाव : बातमीदार**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळ आणि रणपिसे क्लासेस यांच्या संयुक्त विद्यमाने एज्युकेशनल अवेअरनेस प्रोग्राम युनिटच्या संकल्पेनेतून संस्थेचे अध्यक्ष राजीव साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली माणगावमध्ये वेध भविष्याचा.. शिक्षणातील संधी हा कार्यक्रम इयत्ता अकरावी सायन्सच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आला होता.

यामध्ये एमएचटी सीईटी टेस्ट आणि विद्यार्थी, पालक व शिक्षक यांच्यासाठी सुप्रसिद्ध शिक्षक तज्ञ मार्गदर्शक डॉ. दिलीप देशमुख यांचे मार्गदर्शन सत्र झाले. २०० विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. या वेळी डॉ. देशमुख विदयार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांनी आपल्या पात्रतेप्रमाणे पुढील शैक्षणिक दिशा ठरवायला हवी. इस्त्रोसाठी व अन्य ठिकाणी असंख्य विद्यार्थ्यांची भारताला गरज आहे. एमएचटी सीईटीसाठी चांगला अभ्यास करा. चांगले कॉलेज निवडून योग्य ठिकाणी करिअरची सुरुवात कराम असे डॉ. देशमुख यांनी सांगितले.





कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रिन्सिपल डी.एम. जाधव यांनी नियोजन केले होते. शिक्षकांनी सहकार्य केले. अनेक विद्यार्थ्यांनी कार्यक्रम संपल्यानंतरसुद्धा डॉ. देशमुख यांना प्रश्न विचारत जिज्ञासा दाखविली. त्यामुळे हा कार्यक्रम यशस्वी झाल्याची पोचपावती मिळाली. माणगावमधील शिक्षण सदृढ करण्यासाठी एकत्रित काम करण्याची तयारी संतोष रणपिसे यांनी बोलून दाखविली.

**मुरूड : येथील मच्छीमार बांधवांच्या छोट्या होड्या समुद्र किनारी मासेमारी करतात. मासळी पकडून घरी परतताना या होड्या किनाऱ्यावर उभ्या केल्या जातात. त्याचे सुधीर नाझरे यांनी टिपलेले छायाचित्र.**



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेतून शेतकऱ्यांची आर्थिक सक्षमतेकडे वाटचाल

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना ही अनुसूचित जाती आणि नवबौद्ध शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी आणि त्यांच्या जीवनमानात सुधारणा करण्यासाठी महत्त्वाची योजना आहे. या योजनेचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांच्या शेतीसाठी आवश्यक सिंचन सुविधांची निर्मिती करणे आहे. यामुळे शेतकऱ्यांना योग्य पाण्याची सुविधा मिळेल आणि त्यांच्या उत्पादनामध्ये वाढ होईल व ते आर्थिकदृष्ट्या सक्षम होतील.




### अनुदानाची माहिती

या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना विविध प्रकारच्या अनुदानांची सुविधा उपलब्ध आहे. नवीन विहीर २ लाख ५० हजार, जुनी विहीर दुरुस्ती ५० हजार, इनवेल बोअरिंग २० हजार, पंप संच २० हजार (१० अश्वशक्ती क्षमतेच्या विद्युत



पंप संचासाठी १००% अनुदान), वीजजोडणी आकार १० हजार, शेततळ्याचे प्लास्टिक अस्तरीकरण १ लाख, सूक्ष्म सिंचन संच व ठिबक सिंचन संच ५० हजार, तुषार सिंचन संच २५ हजार रुपये असे अनुदान आहे.

### पॅकेजेस

योजनेंतर्गत विविध पॅकेजेस उपलब्ध आहेत.

### नवीन विहीर पॅकेज

या पॅकेजमध्ये नवीन विहीर, पंप संच, वीज जोडणी आकार, सूक्ष्म सिंचन संच, आणि आवश्यकतेनुसार इनवेल बोअरिंग यांचा समावेश आहे.

### जुनी विहीर दुरुस्ती पॅकेज

यामध्ये जुनी विहीर दुरुस्ती, पंप संच, वीज जोडणी आकार, सूक्ष्म सिंचन संच, आणि आवश्यकतेनुसार इनवेल बोअरिंग यांचा समावेश आहे.

### शेततळ्याचे प्लास्टिक अस्तरीकरण

या पॅकेज अंतर्गत शेत तळ्याचे प्लास्टिक अस्तरीकरण करण्यात येते.

## अर्ज प्रक्रिया

योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरावा लागतो. अर्ज भरण्याची प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे.

**वेबसाईट :** www.mahadbt.maharashtra.gov.in http://www.mahadbt.maharashtra.gov.in ऑनलाईन अर्ज भरण्यावर लाभार्थीची निवड लॉटरी पद्धतीने होते. सर्व आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे. जिल्हास्तरीय समितीकडून मंजूरी मिळाल्यानंतर लाभार्थ्यांना अनुदान मिळेल.

### आवश्यक कागदपत्रे

अर्जासोबत पुढील कागदपत्रे सादर करावी लागतात. ७/१२ दाखला आणि ८ अ उतारा, ६ ड उतारा (फेरफार), जात प्रमाणपत्र, तहसीलदारांकडील उत्पन्नाचा दाखला, आधार कार्डाची छायांकित प्रत, बँक पासबुकाची छायांकित प्रत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना ही अनुसूचित जाती आणि नवबौद्ध शेतकऱ्यांसाठी एक महत्त्वाची संधी आहे, ज्यामुळे त्यांच्या शेतीतील उत्पन्न वाढण्यास मदत होईल. या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आवश्यक साधन-संपत्ती उपलब्ध करून देण्यात येते, ज्यामुळे त्यांच्या जीवनमानात सुधारणा होईल. तरी सोलापूर जिल्ह्यातील अनुसूचित जाती आणि नवबौद्ध घटकातील शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ मिळण्यासाठी विहित पद्धतीने अर्ज करावेत. प्रशासनाच्या या योजनेतून आपल्या शेतीला कायमस्वरूपी सिंचनाची सुविधा उपलब्ध करून आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यासाठी प्रयत्न करावेत.

### पात्रतेच्या अटी

या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना काही अटी पूर्ण कराव्या लागतात. जसे की लाभार्थी अनुसूचित जाती/नवबौद्ध शेतकरी असावा. जात प्रमाणपत्र असावे. नवीन विहीरचा लाभ घेण्यासाठी किमान ०.४० हेक्टर शेतजमीन असणे आवश्यक आहे. सामुहिक शेतजमीन किमान ०.४० हेक्टर धारण करणारे एकत्रित कुटुंब लाभ घेऊ शकते. इतर घटकांसाठी किमान ०.२० हेक्टर शेतजमीन असणे आवश्यक आहे. कमाल शेतजमीन ६.०० हेक्टर आहे. ७/१२ दाखला आणि ८ अ उतारा आवश्यक आहे. आधार कार्ड आवश्यक आहे. बँक खाते आधार कार्डाशी संलग्न असावे. स्व. कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजनेंतर्गत जमीन वाटप झालेल्या शेतकऱ्यांना प्राधान्य. वार्षिक उत्पन्न १ लाख ५० हजारपेक्षा कमी असावे. उत्पन्नाचा दाखला तहसीलदारांकडून मिळवावा लागेल. ग्रामसभेची शिफारस आवश्यक आहे.

**-सुनील सोनटक्के,**
माहिती व जनसंपर्क
महासंचालनालय, महाराष्ट्र

# माथेरानमध्ये वसंत ऋतूत निसर्ग बहरतोय!

**माथेरान : रामप्रहर वृत्त**

निसर्गरम्य माथेरान या थंड हवेच्या पर्यटनस्थळी प्रत्येक ऋतुत निसर्गाची किमया आवर्जून पहावयास मिळते. डोळ्याचे पारणे फेडणारा स्वप्नवत स्वर्ग याची देही याची डोळा पाहण्याची संधी आता वसंत ऋतूत माथेरानला अनुभवयास मिळत आहे.

शिशिर ऋतूत निसर्ग आपले जुने अवसान झडकून वसंत ऋतुत निसर्गाने मुक्त हस्ते उधळण करायला सुरुवात केली आहे. त्यामुळे पर्यटक नागरिक सुखावले आहेत. रस्त्यावर ठिकठिकाणी, जंगल परिसरात झाडाची सुकी पाने गळून पडली आहेत. त्यावरून चालताना होणाऱ्या आवाजाने पर्यटक हरखून जातात.









वसंत ऋतुत निसर्ग बहरल्यावर वन्यजीवांचा याच महिन्यात मनोमिलन होत असते. मुंगूस, शेकरू, खारुताई, बुलबुल, पशूपक्ष्यांचे दर्शन होत असताना पहाटे, सायंकाळी किलबिलाटाने निसर्गाच्या आनंदोत्सवामध्ये पर्यटक नागरिकांना वेगळीच पर्वणी अनुभवास मिळत आहे.

सध्या परीक्षेचा काळ असल्याने पर्यटकांची गर्दी कमी आहे, परंतु पुढील आठवड्यात वसंत ऋतुमध्ये निसर्गरम्य माथेरान पहावयास पर्यटकांची पावले इकडे वळतील.

# दिल्लीचा लखनऊवर थरारक विजय

## आशुतोष शर्माने दिली सामन्याला कलाटणी

**विशाखापट्टणम : वृत्तसंस्था**

आशुतोष शर्माच्या विस्फोटक खेळीच्या जोरावर दिल्ली कॅपिटल्सने लखनऊ सुपर जायंट्स संघावर एका विकेटने थरारक विजय मिळवला. आशुतोष शर्मा आणि विपराजच्या खेळीने लखनऊच्या मोठ्या धावसंख्येला आव्हान देत उत्कृष्ट भागीदारी रचली आणि संघाच्या विजयाचा पाया रचला. दिल्लीने सुरुवातीला ६ विकेट्स गमावले असतानाही लखनऊवर एका विकेटने विजय मिळवला.



डोंगराएवढ्या लक्ष्याचा पाठलाग करताना विशाखापट्टणम इथे झालेल्या लढतीत दिल्लीने शरणागतीच पत्करली होती, मात्र आशुतोष शर्माच्या अविश्वसनीय खेळीच्या जोरावर दिल्लीने थरारक विजय साकारला. २१० धावांचा पाठलाग करणाऱ्या दिल्लीची अवस्था ६५/५ अशी होती. ट्रिस्टन स्टब्स आणि विपराज निगम यांनी पाया रचला. यानंतर आशुतोष शर्माने ३१ चेंडूत पाच चौकार आणि पाच षटकारांसह नाबाद ६६ धावांची तडाखेबंद खेळी साकारली.

लखनऊने मिचेल मार्श आणि निकोलस पूरन यांच्या वेगवान अर्धशतकी खेळींच्या बळावर २०९ धावांचा डोंगर उभारला होता. मार्शने ३६ चेंडूत सहा चौकार आणि सहा षटकारांसह ३६ चेंडूत ७२ धावा चोपून काढल्या. पूरनने ३० चेंडूत सहा चौकार आणि सात षटकारांसह ७५ धावा कुटल्या. या दोघांनी तिसऱ्या विकेटसाठी ४२ चेंडूत ८७ धावांची भागीदारी रचली. ही भागादारी फुटल्यानंतर लखनऊचा वेग मंदावला.

लखनऊचा नवा कर्णधार ऋषभ पंत सहा चेंडूत भोपळाही न फोडता तंबूत परतला. डेव्हिड मिलरने २७ धावा केल्या आणि त्याच्या अखेरच्या दोन चेंडूंवरील षटकारामुळे लखनौने दोनशेची वेस ओलांडली. दिल्लीकडून कुलदीप यादवने चार षटकात अवघ्या २० धावा देत दोन विकेट्स पटकावल्या. मिचेल स्टार्कने तीन विकेट्स घेतल्या.

प्रत्युतरादाखल खेळताना शार्दूल ठाकूरच्या पहिल्याच स्पेलमध्ये जेक फ्रेझर मॅकगर्क आणि अभिषेक पोरेल तंबूत परतले. समीर रिझवी सिद्धार्थची शिकार ठरला. अनुभवी फाफ डू प्लेसिसने २९ धावा केल्या. रवी बिश्नोईने त्याची खेळी संपुष्टात आणली. नवोदित दिग्वेश राठीने दिल्लीचा कर्णधार अक्षर पटलेला माघारी धाडले.

निम्मा संघ तंबूत परतलेला असताना ट्रिस्टन स्टब्स आणि विपराज निगम यांनी ३५ चेंडूत ४८ धावांची भागीदारी केली. स्टब्ज बाद झाल्यानंतर सामन्याचे पारडे लखनऊच्या दिशेने झुकले, पण आशुतोष शर्माने मैदानात उतरताक्षणीच चौकार, षटकारांची लयलूट सुरू केली. धावगतीचे आव्हान १२च्या पल्याड गेलेले असताना आशुतोष-विपराज जोडीने २२ चेंडूत ५५ धावा कुटल्या.

मोक्याच्या क्षणी राठीने विपराजला बाद केले. त्याने १५ चेंडूत ३९ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. त्यानंतर मिचेल स्टार्क आणि कुलदीप यादवही बाद झाले, पण आशुतोषने हार मानली नाही. कुलदीप बाद झाल्यावर आशुतोषने चौकार-षटकार लगावले. शेवटच्या षटकात दिल्लीला सहा चेंडूत सहा धावा हव्या होत्या. शाहबाझ अहमदचा पहिला चेंडू निर्धाव पडला. दुसऱ्या चेंडूवर मोहित शर्माने एक धाव काढली. तिसऱ्या चेंडूवर आशुतोषने विजयी षटकार लगावत दिल्लीच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. ऋषभ पंतने सोडलेला एक झेल आणि स्टम्पिंग लखनऊला महागात पडले.

# दिव्यांग कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्र संघ ठरला अजिंक्य

## रोह्यातील सहदेव बर्डेचे दमदार नेतृत्व




**धाटाव : प्रतिनिधी**

उत्तर प्रदेशातील गाजियाबाद येथे झालेल्या अखिल भारतीय दिव्यांग कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्र संघाने विजेतेपद पटकाविले. या संघाचा कर्णधार म्हणून रायगड जिल्ह्याच्या रोहा तालुक्यातील वाशी गावाचा सुपुत्र सहदेव बर्डे याने नेतृत्व केले.

अंतिम लढत महाराष्ट्र विरुद्ध राजस्थान अशी रंगली. या लढतीमध्ये महाराष्ट्र संघाने पकडी व चढायांचा उत्कृष्ट नमुना पेश करीत तब्बल २४ गुणांनी राजस्थान संघावर मात करून अजिंक्यपद प्राप्त केले.

स्पर्धेत उत्कृष्ट खेळाडू म्हणून महाराष्ट्राचा राज राठोड (नांदेड), तर उत्कृष्ट पकड करणाऱ्या मंगेश जाधव (रायगड) यालाही गौरवण्यात आले.

या संघात उपकर्णधार सचिन तांडेल (पालघर), ओंकार महाडिक (माणगाव, रायगड), अमर मन्यार (कल्याण, ठाणे), महेश ओसावे (नंदुरबार), हितेश पाटील (अलिबाग, रायगड), राज राणे (महाड रायगड), निलेश भाटे व राम कुरवाले (नागपूर) यांचा समवेश होता. मुख्य प्रशिक्षक रवींद्र सकपाळ व एनआयएस कोच बिंदूक निकम, गाजियाबाद येथे मदन हे मुख्य कोच होते.

# महाड क्रिकेट संघ विजेता



**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा येथील हरेश्वर मैदानात भिवंडी, पालघर, पनवेलमधील आयकॉन खेळाडूंच्या सहभागाने स्व. जनार्दन हाले स्मृती चषक मर्यादित षटकांची टेनिस बॉल स्पर्धा खेळली गेली. हॅपी शॉपने पुरस्कृत केलेल्या या स्पर्धेत महाड संघ विजेता ठरला.

स्पर्धेत एकूण २४ संघांनी सहभाग घेतला होता. व्दितीय क्रमांक भोसले वॉरियर्स पुरस्कृत तळेखार ब संघाने आणि तृतीय क्रमांक माऊ एकविरा थळ या संघाने प्राप्त केला. स्पर्धेत उत्कृष्ट फलदांज नागेश शिंद (थळ), उत्कृष्ट गोलदांज व अंतिम सामन्याचा सामनावीर जयेश खेरकर (महाड), उत्कृष्ट क्षेत्ररक्षक तेजस काटकर (तळेखार ब संघ), मालिकावीर व षटकार किंग ओमकार महाडीक यांची निवड करण्यात आली. विजेते संघ व वैयक्तिक उल्लेखनीय कामगिरी करणारे खेळाडू यांना स्व. जनार्दन हाले कुटुंबियांच्या हस्ते बक्षीस देण्यात आले.

पंचाचे काम प्रवीण आंद्रे, राजू पाटील व पुरुषोत्तम भगत यांनी पाहिले; तर इम्रान बुखारी व विकास साखरकर यांनी समालोचन केले.

# तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत चिवे संघाची बाजी

**पाली : प्रतिनिधी**

जय हनुमान सामाजिक सेवाभावी संस्था भेरव यांच्या वतीने आणि सुधागड तालुका स्पोर्ट्स असोसिएशनच्या मान्यतेने भव्य तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन नुकतेच भेरव या ठिकाणी करण्यात होते. या स्पर्धेत प्रथम क्रमांकाचा मानकरी श्री स्वयंभू हनुमान संघ चिवे हा ठरला.



स्पर्धेत एकूण १६ संघानी सहभाग घेतला होता. द्वितीय क्रमांक भैरीनाथ क्रीडा मंडळ वावे, तृतीय ओम कालभैरव क्रीडा मंडळ आपटवणे आणि चतुर्थ क्रमांक जय हनुमान क्रीडा मंडळ आसरे नवघर यांनी प्राप्त केला. या विजेत्या संघांना मान्यवरांच्या हस्ते रोख रक्कम व आकर्षक चषक देण्यात आले.

स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू स्वप्नील भिलारे (चिवे), उत्कृष्ट चढाईपटू सुमित सुतार (आसरे नवघर), उत्कृष्ट पकडपटू विशाल मस्के (वावे), पब्लिक हीरो प्रतीक बामणे (आपटवणे) या खेळाडूंना आकर्षक बक्षीस देऊन गौरविण्यात आले. याशिवाय स्पर्धेतील अंतिम चार संघ विजयी कर्णधार अमर ठाकूर (चिवे), करण म्हस्के (वावे), शिरीष कदम (आपटवणे) आणि सुमित सुतार (आसरे नवघर) यांनादेखील आकर्षक बक्षीस देण्यात आले.

स्पर्धेसाठी राज्यसभेचे खासदार धैर्यशील पाटील यांची उपस्थिती लाभली. त्यांना मान्यवर व नागरिकांनी वाढदिवसनिमित्त शुभेच्छा दिल्या.

स्पर्धेवेळी भाजप नेते प्रकाश देसाई, राज्य कार्यकारिणी सदस्य राजेश मपारा, पाली नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष अरिफ मणियार, सुरेश खैरे, रमेश सागळे, राष्ट्रवादी सुधागड तालुका अध्यक्ष संदेश शेवाळे, मराठा समाज अध्यक्ष धनंजय साजेकर, शिवसेना विभाग प्रमुख सतीश देशमुख, नगरसेवक पराशेठ मेहता, नाडसुर ठाणाले उपसरपंच मोरेश्वर स्वामकर, सृष्टी इंटरप्राईजेस उद्योजक संजय सागळे, सामाजिक कार्यकर्ते नितीन देशमुख, सुहास कुर्ले, यशवंत कदम, पोलीस पाटील अमिषा सागळे, अक्षय मोरे आदी उपस्थित होते.

# अलिबागमध्ये क्रीडा स्पर्धा रंगल्या; विजेत्यांचा गौरव

**अलिबाग : प्रतिनिधी**

युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालय अंतर्गत नेहरू युवा केंद्र रायगड-अलिबाग यांच्या माध्यमातून व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय रायगड आणि प्रिझम सामाजिक विकास संस्था अलिबाग यांच्या सहकार्याने नेहरू युवा केंद्राचे युवा अधिकारी निशांत रौतेला यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली नुकत्याच जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.





या स्पर्धेत १०० मीटर धावणे, गोळाफेक या स्पर्धा जिल्हा क्रीडा संकुल नेहुली या ठिकाणी झाल्या. मुलांसाठी कबड्डी स्पर्धा, मुलींसाठी खो-खो या स्पर्धा पीएनपी माध्यमिक शाळा, गोकुळेश्वर वेश्वी येथे झाल्या. पुरुष खुला गट कबड्डी स्पर्धेत पीएनपी कनिष्ठ विद्यालयाने प्रथम क्रमांक पटकावला. स्पर्धा विश्व अकॅडमी अलिबाग द्वितीय, प्रिझम टीमने तृतीय क्रमांक पटकावला. महिला खो-खो खुला गटात अजिंक्य क्रीडा संस्था अलिबाग एककेएस यांनी प्रथम क्रमांक, स्पर्धा विश्व अकॅडमी द्वितीय आणि प्रिझम संस्थेने तृतीय क्रमांक प्राप्त केला.

१०० मीटर धावणे पुरुष खुला गट गौरव महेंद्र पाटील प्रथम, अक्षय अशोक देसाई द्वितीय, शिवकुमार निलंगे तृतीय; महिला खुला गटात रिया राकेश गुंजाळ प्रथम, नेहा संदीप मानकर द्वितीय व साक्षी शशिकांत पाटील हिने तृतीय क्रमांक मिळवला.

गोळाफेक स्पर्धेत मुलींमध्ये हर्षाली गावंड प्रथम, ओवी पाटील द्वितीय, जीविका म्हात्रे तृतीय; मुलांमध्ये श्लोक नाईक प्रथम, केतन राणे द्वितीय, श्रेयस पाटीलने तृतीय क्रमांक मिळविला. सर्व विजेत्या खेळाडूंना प्रमाणपत्र व मेडल देऊन सन्मानित करण्यात आले.

गायिका ड. कला पाटील, कोरिओग्राफर प्राजक्ता कोकणे, पी.एन.पी. कनिष्ठ विद्यालयाचे उपप्राचार्य निशिकांत कोळसे, आंतरराष्ट्रीय खेळाडू तथा राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी भारत सरकार तपस्वी गोंधळी, स्वयंसिद्धा संस्थेच्या अध्यक्षा तथा स्पर्धा विश्व अकॅडमीच्या संचालिका सुचिता साळवी, नेहरू युवा केंद्राचे प्रतिनिधी जयेश म्हात्रे यतीराज पाटील, शिक्षक सहकारी तेजस म्हात्रे,पी.एन.पी. कनिष्ठ विद्यालयाचे शिक्षक सहकारी, नुकतीच मुंबई पोलीस पदी निवड झालेली स्पर्धा विश्व अकॅडमीची विद्यार्थिनी दिव्या मोकल, रायगड पोलीस शिवानी चव्हाण, राष्ट्रीय खेळाडू ऋतुजा सकपाल, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाचे कर्मचारी उपस्थित होते.




### नमुंमपा चषक राज्य अजिंक्यपद व्हॉलीबॉल स्पर्धा

# नागपूर, पुणे संघ विजेते

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने महाराष्ट्र व्हॉलीबॉल असोसिएशनच्या मान्यतेने आणि ठाणे जिल्हा व्हॉलीबॉल असोसिएशन, नवी मुंबई मॅच्युअर व्हॉलीबॉल असोसिएशन व कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय वाशी यांच्या सहयोगाने नवी मुंबई महापालिका चषक राज्य अजिंक्यपद व्हॉलीबॉल स्पर्धा उत्साहात झाली.



पुरुष गटात सहभागी १६ जिल्ह्यांच्या नामांकित संघांमधून नागपूरने अंतिम सामन्यात मुंबई उपनगर संघावर २५-२०, २५-१९, २५-१७ अशी सलग तीन सेटमध्ये मात करीत स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले.

महिला गटात आठ संघांमधून पुण्याच्या संघाने नागपूरवर २५-२३, २५-१७, २५-३० अशी सलग तीन सेटमध्ये मात करीत अजिंक्यपद पटकावले.


महाराष्ट्र व्हॉलीबॉल असोसिएशनचे अध्यक्ष विजय डांगरे, क्रीडा अधिकारी रेवप्पा गुरव, उपाध्यक्ष धनंजय वनमाळी, सचिव संजय नाईक, सहसचिव निलेश जगताप, कोषाध्यक्ष अरविंद गवई, बुलढाणा जिल्हा व्हॉलीबॉल असोसिएशनचे अध्यक्ष गुलाब राठोड, आंतरराष्ट्रीय बास्केटबॉलपटू स्वामीनाथन, स्पर्धा संयोजक किरण स्टेनली व ठाणे जिल्हा असोसिएशनचे सचिव किरण बावस्कर, आशिष ओबरॉय आणि इतर मान्यवरांच्या हस्ते सांघिक व वैयक्तिक पारितोषिके प्रदान करण्यात आली.

स्पर्धेत पुरुष गटात पुणे संघ तृतीय क्रमांकाचा व मुंबई शहर संघ चतुर्थ क्रमांकाचा मानकरी ठरला. महिला गटात नाशिकच्या संघाने तृतीय व मुंबईच्या संघाने चतुर्थ क्रमांक पटकावला.

पुरुषांमध्ये नागपूर संघाचा व्हॉलीबॉलपटू केवल बराई, तर महिलांमध्ये पुणे संघाची व्हॉलीबॉलपटू मृणाल आगरकर मालिकावीर किताबाचे मानकरी ठरले.

पुरुषांमध्ये मुंबई उपनगर संघाचा सय्यद मुबारक तसेच महिलांमध्ये नागपूर संघाची जयश्री ठाकरे बेस्ट टॅकर पुरस्काराने नावाजले गेले.

बेस्ट सेटर म्हणून पुरुषांमध्ये नागपूर संघाचा हेमंत छारडे व महिलांमध्ये पुणे संघाची रश्मी कदम वैयक्तिक पुरस्काराने सन्मानित झाली.



## भाई चषक क्रिकेट स्पर्धा

**उरण : रामप्रहर वृत्त**

उरण तालुक्यातील मानाची भाई चषक २०२५ क्रिकेट स्पर्धा सुधीर घरत सामाजिक संस्थेच्या वतीने नवघर येथे २६ ते ३० मार्चदरम्यान आयोजित करण्यात आली आहे.

वीर वाजेकर मैदानात खेळल्या जाणाऱ्या या रजनी क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते २६ मार्च रोजी सायंकाळी ७ वा. केले जाणार आहे. या वेळी उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com